# माझी अमेरिकावारी



## नंदिनी देशमुख



# माझी अमेरिका वारी - भाग १

नंदिनी नीळकंठ देशमुख

nandini.deshmukh@gmail.com

mob. 9004094617

ई साहित्य प्रतिष्ठान

# माझी अमेरिकावारी

(Majhi Amerikawari)

लेखिका:- नंदिनी देशमुख

nandini.deshmukh@gmail.com

9004094617

प्रकाशक: ई-साहित्य प्रतिष्ठान

वेब: www.esahity.com

ईमेल esahity@gmail.com

प्रकाशन : 23 May 2016

©esahity Pratishthan®2016

❖ या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण किंवा रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

# मनोगत

भारतामधून जे कुणी वयस्कर लोक अमेरिकेत जातात त्यातील नव्वद टक्के लोक आपल्या मुलीच्या किंवा सुनेच्या बाळंतपणासाठी जातात. अमेरिकेतील लोकांना याचे आश्चर्य वाटते. त्यांच्या दृष्टीने लग्न, बाळंतपण या गोष्टींसाठी आईवडिलांनी यायची काय गरज? हाच तर आपल्या आणि त्यांच्या संस्कृतीमधला फरक आहे ना? सुख दु:खामध्ये आपल्या जवळच्या लोकांना सामील करून घेणे ही आपली संस्कृती.

माझी सगळयात लहान मुलगी रश्मी, हिच्या बाळंतपणाच्या निमित्ताने मलाही असाच अमेरिकेला जाण्याचा योग आला. केवढे अप्रूप या गोष्टीचे. माझ्या प्रवासाच्या आठवणी मी लिहून ठेवल्या. ही गोष्ट डिसेंबर २००८ मधील. त्यालाही आता सात आठ वर्ष झाली. मी आल्यानंतर बरेच लोक कुतूहलाने मला अनेक प्रश्न विचारीत. तेथील माहिती विचारीत. तसेच कुणाला जायचे असेल तर मला त्यांचे फोन येत किंवा कुणी प्रत्यक्ष भेटून त्यांच्या मनातील शंका कुशंका विचारीत. (जशा मी पण काही लोकांना जायच्या आधी विचारल्या होत्या. ) त्यामुळे आपल्या अनुभवामध्ये इतरानाही सहभागी करून घ्यावे असे वाटले. तेव्हाच्या पेक्षा आता अमेरिकेला जाण्याचे प्रमाण वाढले आहे. पर्यटन करण्यासाठी सुध्दा आता लोक सहज युरोप, अमेरिकेची ट्रीप करतात. त्यावेळी तसे नव्हते. शिवाय या सात आठ वर्षामध्ये आपल्याकडेही मॉल संस्कृती, इन्टरनेट, टी. व्ही., मोबाईल मुळे रोजच्या व्यवहारामध्ये खूप फरक पडला आहे. त्यात नाविन्य असे काही राहिले नाही. त्यामुळे मी लिहिलेल्या

आठवणीतील बऱ्याचशा गोष्टी मला त्या वेळी जरी नवीन वाटल्या तरी आता काही त्या तशा वाटणार नाहीत. शिवाय मी नांदेडसारख्या एका छोट्या जिल्ह्याच्या ठिकाणाहून एकदम अमेरिकेला गेले, त्यामुळेही कदाचित हा फरक मला जास्त जाणवला असावा.

ह्या ‘अमेरिका वारी’ प्रवास वर्णनाचे मी एकंदर तीन भाग केले. पहिला भाग म्हणजे जाण्याचे ठरले तेव्हापासून विमानात बसेपर्यंत. सुरवातीला तयारी करतानाचे अनुभव, पासपोर्ट, व्हिसा, चार-पाच महिन्यासाठी जायचे म्हणजे इथली सगळी तयारी, शारीरिक, मानसिक आणि आर्थिक, हा सगळा अनुभव पहिल्या भागात आला आहे. दुसऱ्या भागात तेथील रोजचे घरातील दैनंदिन जीवन. तिकडील बाळंतपणाचे आपल्याकडील लोकांना खूप कुतूहल असते. तसेच रोजचे जीवन कसे असते याचीही उत्सुकता असते. ते सगळे सविस्तर वर्णन दुसऱ्या भागात केले आहे. आणि तिसऱ्या भागात आम्ही तिथे जवळपास कुठे कुठे फिरलो, काय काय बघितले त्याच्या आठवणी.

आठवणी लिहिताना त्या सरळ सरळ लिहिल्या होत्या. प्रसिध्द करतांना त्या बऱ्याच व्यवस्थित संकलित कराव्या लागल्या. मुख्य म्हणजे आधी रश्मीला सगळे वाचायला दिले आणि तिची संमती मिळाल्यावर नीलम आणि नमिता या दोघींना पण वाचून त्यांचे मत विचारले. सगळयांच्या विचाराने शेवटची प्रत तयार केली. आगामी पुस्तकांच्या यादीत सुनील सामंत यांनी बऱ्याच दिवसांपूर्वी या पुस्तकाची घोषणा केली, पण या सगळया गोष्टींमुळे थोडा उशीर झाला. त्याबद्दल मी इ-साहित्यची दिलगीर आहे. पण आपल्या अनुभवामध्ये इतरांना सामील करून घेणे हा आनंद एक वेगळेच समाधान देवून जातो.

माझ्या तीनही मुली आणि जावई, नीलम-गिरीष, नमिता-निखील, आणि मुख्य रश्मी-सारंग ज्यांच्यामुळे मला अमेरिकेला जाण्याचा योग आला, हे सर्व माझ्या आयुष्याचे अविभाज्य घटक आहेत, त्यामुळे त्यांचे आभार मानणे म्हणजे मी माझे स्वतःचे आभार मानण्यासारखे आहे. तरीपण अशा मुली आणि असे जावई मला मिळाले हे मी माझे नशीब आणि त्याबद्दल परमेश्वराचे आभार मात्र नक्कीच मानते. या प्रवासाला जाण्यासाठी माझे नातेवाईक, मित्र-मैत्रिणी, कार्यालयीन सहकारी यांचे सहकार्य मला मिळाले, त्यांचीही मी आभारी आहे.

सुनील सामंत यांनीही त्यांच्या व्यापातून वेळ काढून बराच पत्रव्यवहार केला, आणि इ-साहित्यने हे माझे पुस्तक प्रकाशित केले त्याबद्दल मी त्यांची आभारी आहे.

धन्यवाद.

नंदिनी देशमुख

# अर्पण पत्रिका

माझ्या मुली, जावई आणि नाती

नीलम-गिरीष

नमिता-निखील

रश्मी-सारंग

आणि

अमेया, राधिका, विभा, मिहिका आणि श्रुती

यांना, त्यांनी माझ्या जीवनात भरभरुन दिलेल्या आनंदाप्रित्त्यर्थ. . . . .

'ही वाट दूर जाते स्वप्नामधील गावा' असे म्हणण्याऐवजी मी कधीतरी असे म्हणाले असेन की 'ही वाट दूर जाते, स्वप्नामधील देशा' आणि माझे ते स्वप्न पहाटेला पडले असावे. म्हणूनच ते खरे झाले असणार. स्वप्न सगळीच बघतात पण सगळयांची सगळीच स्वप्न सत्यात उतरतील याची खात्री नाही. तसेच माझेही एक स्वप्न होते, अमेरिका बघण्याचे. त्यावेळी तर ती गोष्ट अशक्य कोटीतील वाटायची. मोठमोठ्या शहरातील उच्च शिक्षित लोकांसाठी अमेरिकेला जाणे ही सहज साध्य गोष्ट असली तरी नांदेडमध्ये राहणा-या माझ्यासारखीला ते एक स्वप्न बघण्यासारखेच होते. कालांतराने ते स्वप्न सत्यात जरी उतरले तरीही अजूनही स्वप्नच वाटते.

माझी चिमुकली रश्मी, लग्न होवून अमेरिकेला गेली, तेव्हा सगळे म्हणायचे, आता पासपोर्ट, व्हिसा काढून घ्या. ती गोष्ट मी हसण्यावारी नेत असे. रश्मीला तिकडे जावून दीड वर्ष झाले होते आणि एक दिवस अचानक तिचा फोन आला.

‘आई, एक आनंदाची बातमी आहे. ’

‘हो का? काय गं? ’ आता नवीन लग्न झालेले म्हंटल्यावर आनंदाची बातमी दुसरी काय असणार? मला थोडा अंदाज आला पण विचार केला तिच्याच तोंडून ऐकावे. ’

‘आई, तू आजी होणार आहेस. ’ माझ्या मनात जो विचार आला होता तोच तिने सांगितला. तिकडे तिचा आवाज आनंदाने ओसंडून जात होता आणि इकडे आनंदाने माझ्या डोळ्यात पाणी आले. ती उत्साहाने बोलत होती,

‘ आई, तू आता लौकरात लौकर पासपोर्ट आणि व्हिसा काढून घे. इकडे येण्याच्या तयारीला लाग. ’ माझ्या डोळ्यांसमोर एक प्रचंड पोकळी निर्माण झाली. अमेरिकेला जायचे? आपण? . . बाप रे. रश्मीचे बाळंतपण करायला जायचे होते पण इकडे माझ्या डोळयासमोर माझे बाळंतपण (म्हणजे खऱ्या अर्थाने नव्हे, कामाचे व्याप वाढले की जो राडा होतो ते बाळंतपण) दिसत होते. पासपोर्ट, व्हिसा, ऑफिसमधून सुट्टी मिळणे आणि चार पाच महिन्यासाठी जायचे म्हणजे इकडची सगळी तयारी करून जाणे. चला तर मग नंदिनीबाई लागा तयारीला. मी माझ्या मनाला सांगितले.

एखाद्या शुभ प्रसंगी जसे आद्य देवतांना नमन करावे लागते तसेच अमेरिका वारी म्हंटले की आधी पासपोर्ट आणि व्हिसा यांच्या मागे लागावे लागते. त्याप्रमाणे पासपोर्ट मिळाला आणि व्हिसाची तयारी सुरु झाली.

२४ ऑक्टोबर २००८. व्हिसाच्या इंटरव्ह्यूची तारीख ठरली आणि पोटात एकदम गोळाच आला. इंटरव्ह्यू कसा असतो? सोबत काय घेवून जायला पाहिजे? तिथे कसे प्रश्न विचारतील, काय काय विचारतील? इंटरव्ह्यू घेणारे लोक कसे असतील? ते लोक जे काय बोलतील ते आपल्याला समजेल का? काय काय विचार डोक्यात येत होते. फॉर्म भरणे, कागदपत्र गोळा करणे ह्याची धांदल सुरु झाली. त्या फॉर्म वर असलेल्या सर्व सूचना वाचल्या. त्यावर लावण्यासाठी 2x2 साईजचा फोटो काढावा लागणार. फोटो जर त्यांच्या नियमाप्रमाणे नसला तर अडचण येवू शकते असे कळले. (ती अडचण काय असते तेही नंतर कळले). त्या फॉर्मवर दोन नमुना फोटो होते. फोटो कसा असावा आणि फोटो कसा नसावा याबद्दल काही सूचना होत्या. फोटोमध्ये चेहरा अगदी समोरून आला पाहिजे, दोन्ही कान दिसले पाहिजेत, पाठीमागे पूर्ण पांढरी पार्श्वभूमी असावी, दोन्ही बाजूंना आणि डोक्याच्या वर एवढे एवढे अंतर असावे. इ. इ. मी त्या कागदाची प्रिंट घेतली आणि तो कागद घेवूनच घराजवळच्या एक फोटोस्टुडीओत गेले. त्याला तो कागद दाखवला. त्या सर्व सूचना आणि ते नमुना फोटो पण दाखवले. असाच फोटो मला व्हिसासाठी काढून हवा आहे आणि फोटो जर बरोबर नसेल तर फॉर्म नाकारल्या जाण्याची शक्यता आहे हे पण त्याला सांगितले. त्याने लगेच एक फूट पट्टी आणून फोटोची साईज मोजण्यास सुरवात केली. त्याच्या चेहऱ्याकडे बघून तरी त्याला हे काम जमेल अशी मला खात्री वाटली नाही. आणि तो ही तशी खात्री देत नव्हता. माझ्या लगेच लक्षात आले,

अरे ही काही याच्या बसची बात दिसत नाही. चला, दुसरीकडे कुठेतरी शोध घ्यावा लागेल.

दुसरे दिवशी दुस-या एका चांगल्या मोठ्या स्टुडीओत गेले. मला काय हवे ते सगळे त्यानाही सांगितले. त्या माणसाने तत्परतेने मला एक चार्ट दाखवला. दाखवणारच. कारण पासपोर्टसाठी फोटो काढायचा म्हणजे मी परदेशात जाणार हे त्याच्या लक्षात आले. म्हणजे आम्ही आता फॉरेन रिटर्न होणार. तेवढा तर भाव खायलाच हवा ना. त्याने काही फोटोही दाखवले, त्यावर त्या सगळ्यांची साईज लिहिलेली होती. माझ्या हातातील सुचानांशी मी ते सगळे पडताळून बघितले. माझ्या मनाचे समाधान झाल्यावरच मी तिथे फोटो काढून घेतला. अर्थातच तो फोटो काही मला आवडला नाही पण व्हिसा, पासपोर्टच्या फोटोसाठी आवडणे, न आवडणे हे निकष लागू होण्याचा प्रश्नच नव्हता. तो काही कुठे दाखवायला नव्हता पाठवायचा. त्या फोटोग्राफरला आणि त्या पासपोर्ट ऑफिसला त्याचे काही सोयर सुतक नव्हते. असा म्हणजे असाच पाहिजे बस! आम्ही दिलेल्या सर्व सूचना बरोबर पाळल्यात ना, मग ठीक आहे. त्या फोटोमध्ये नाक डोळे असलेली एक व्यक्ती दिसते आहे आणि ती व्यक्ती स्त्री आहे का पुरुष हे ओळखू येत आहे ना, झाले तर मग!

कामांच्या यादीतले पहिले फोटोचे काम तर झाले. आता दुसरा नंबर होता रजा मंजूर झाल्याचे ऑफिसचे पत्र. ते एवढ्या लौकर मिळणे शक्यच नव्हते. कारण मी जाणार होते डिसेंबर मध्ये आणि रजेसाठी अर्ज करणार

जूनमध्ये. एवढे सहा महिने आधी कोण आणि कुठल्या ऑफिसमध्ये रजेची मंजुरी देणार? मोठी रजा, लॉंग लिव्ह. आणि तेही लेखी स्वरुपात? माझी रजेची फाईल टेबलवर ‘अंडर प्रोसेस’ होती. मी माझ्याकडून अर्ज केला होता ही माझी जमेची बाजू. हो, पुन्हा कुणी म्हणू नये, तुम्ही आधी का सांगितले नाही म्हणून?

त्यानंतर ऑफिसचे नेमणूक पत्र, पगार पत्रक किंवा तुम्ही अमुक अमुक ठिकाणी काम करत आहात असे त्या ऑफिसचे प्रमाणपत्र हवे होते. बरीच जुनी कागदपत्रे काढल्यानंतर नेमणूक पत्र एकदाचे सापडले. ते चोवीस वर्षापूर्वीचे होते. त्यातला स्केलही त्या वेळेसचा. विचार केला, काही का असेना आपण नोकरी करतो याचा पुरावा तर आहे ना? शिवाय ऑफिसमधून चालू तारखेमध्ये पगाराचे प्रमाणपत्र (salary certificate ) घेतले. . हे सर्व कसेबसे तयार करून गिरीषच्या पत्त्यावर मुंबईला पाठवले. एच. डी. एफ. सी. बँकेमध्ये सात हजार रुपये भरून एक पावती घ्यायची होती, ती गिरीषने घेवून ठेवली होती. त्यांनी एकदा ही सगळी कागदपत्रे नजरेखालून घालून व्हिसाच्या ऑफिसमध्ये पाठवायची असे ठरले होते. रश्मी आणि सारंग कडूनही काही कागदपत्रे पाहिजे होती, ती त्यांनी पोस्ट केली होती. ती कागदपत्रे त्या फॉर्म सोबत जोडायची आवश्यकता नव्हती. मी जातांना बरोबर घेवून जाणार होते. गिरीषने तिकीटही काढून ठेवले होते. पाच डिसेंबरला रात्री बारा वाजता डेल्टा एयर लाईन्सचे फ्लाईट होते. मध्ये एकदा फ्लाईट बदलावे लागणार होते. म्हणजे डायरेक्ट बस किंवा ट्रेन नसेल तर आपण मध्येच ती बदलतो तशी. परदेशात

जाताना सुध्दा अशी बदला बदली करावी लागते तर! मला गंमत वाटली. मुंबई ते अटलांटा आणि अटलांटा ते सॅनफ्रानसिस्को असा प्रवास होता. गिरीषने खूप विचार करून तिकीट बुक केले होते. कारण अटलांटाहून सॅनफ्रानसिस्को फक्त पाच तासाचा प्रवास होता आणि अटलांटा यू. एस. मधेच असल्यामुळे काही प्रॉब्लेम आलाच तर सारंग आणि रश्मीशी लगेच संपर्क साधता आला असता. मी एकटीच जाणार होते. मनात एक वेगळीच हुरहूर दाटून आली होती. आपण एकटीने एवढ्या लांब जायचे हा विचार मनात आला की छातीत धडधडायला लागायचे. आत्तापर्यंत एकटीने बराच प्रवास केला असला तरी आता एकदम विमानात बसून थेट अमेरिकेलाच? विमानातही पहिल्यांदाच बसायचे. अजून विमानतळ पण कधी बघितले नव्हते, सिनेमात काय बघितले तेवढेच. शिवाय त्याबद्दल काय काय वाचले होते आणि ऐकले होते, ते वेगळेच. विमान जेव्हा उडेल तेव्हा उडेल पण माझ्या मनाची आणि डोक्याची फडफड मात्र सुरु झाली होती.

मधेच उगाचच असे वाटले की जाण्याआधी एकदा आपल्या कुलदैवतेचे, तिरुपती बालाजीचे दर्शन घ्यावे. अनायासे निखील आणि नमिता चेन्नईला होते, अमेरिकेला जाण्या आधी त्यांची पण भेट झाली असती. मी त्यांना तसे बोलून दाखवले तर काय त्यांनी दोघांनी सुट्टी काढून तिरुपतीला जाण्यासाठी बुकिंगही करून टाकले.

बुकिंग करतांना त्यांनी मला विचारूनच तारीख ठरवली. पण काय झाले कोण जाणे? कुठेतरी, काहीतरी बिनसल्यासारखे वाटू लागले. विनाकारणच मन अस्वस्थ व्हायचे. खरे तर ऑक्टोबरचा दुसरा आठवडा अतिशय कामाचा. ग्रामीण भागातील टेलिफोन लाईन्ससाठी मिळणारी सबसिडी बनवून पाठवण्याचा सप्टेंबर क्वार्टर एंडिंगचा तो काळ. पण तिकीट बुक करतांना ही गोष्ट माझ्या लक्षातच आली नाही. कारण बुकिंग बरेच दिवस आधी केले होते. सर्व कार्यक्रम आधीच ठरला असल्यामुळे नंतर तो रहित करणे शक्य नव्हते. निखील, नमाला पण पुन्हा सुट्टी मिळाली नसती. इकडे ऑफिसमध्ये साहेब नाराज झाले कारण ते संपूर्ण काम त्यांना एकट्यालाच करावे लागणार होते. शिवाय त्याच काळात तरंग सेवेचे नवीन पॅकेज आले होते. ते सर्व काम पुण्याला सेन्ट्रलाईज झाले होते त्यामुळे माहितीसाठी सतत पुण्याच्या संपर्कात रहावे लागे. मी सुट्टीवर जाण्यापूर्वी सर्व कामांची बरीचशी तयारी करुन ठेवली. जेवढी जास्तीत जास्त माहिती गोळा करता येईल तेवढी केली. आपण सुट्टीवर गेल्यावर इतरांना त्रास होवू नये याची काळजी घेतली. शिवाय अडल्या नडल्या परिस्थितीत मोबाईल होताच. मनाचा निर्धार करून मी निघालेच. नांदेडहून देवगिरीने सिकंदराबादला जावून तिथून संध्याकाळी सहा वाजता निघणारी चेन्नई एक्स्प्रेस पकडायची होती. सकाळी साडे आठ, नऊला नांदेडहून निघणारी देवगिरी सिकंदराबादला दुपारी तीन वाजेपर्यंत पोंचते. जरी लेट झाली तरी जास्तीत जास्त पाच वाजेपर्यंत गेली असती. सहा वाजताची चेन्नई एक्स्प्रेस

मिळणे अवघड नव्हते. शिवाय मी पूर्वी एकदोनदा तशी गेले होते. पण त्या दिवशी साडे आठ नऊला येणारी देवगिरी साडे अकरा वाजले तरी आली नाही. गाडी चार तास लेट आहे अशी अनाऊंसमेंट झाली. काय करावे? जाण्याचे रहित करावे का? जावून काय उपयोग? पुढची गाडी मिळाली पाहिजे. नाहीतर फजिती. मी स्टेशन मास्तर कडे गेले आणि त्यांना म्हणाले,

'सर, मला पुढची गाडी पकडायची आहे, देवगिरी नक्की केव्हा येईल आणि सिकंदराबादला केव्हा पोंचेल? '

ते म्हणाले 'काही सांगता येत नाही. गाडी अजून आलीच नाही. शिवाय इथून सिकंदराबादला जाण्यासाठी कमीतकमी साडेपाच ते सहा तास लागतात. '

मी पुन्हा त्यांना विनंती केली, 'तुम्ही सिकंदराबादला फोन करून सांगू शकाल का की या गाडीने प्रवास करणारे काही प्रवासी पुढे चेन्नई गाडीने जाणार आहेत. तेव्हा देवगिरी येईपर्यंत तुम्ही चेन्नई एक्स्प्रेस सोडू नका. '

त्यांनी माझ्याकडे थोडे विचित्र नजरेने बघितले. पण प्रयत्न करणे माझे काम होते. ते म्हणाले,

'तसं कसं सांगता येईल बाई? तुम्ही असं करा, ती तिकडे तीन नंबरवर निजामबाद गाडी उभी आहे, त्या गाडीने निजामबाद पर्यंत जा आणि तिथून पुढे बसने सिकंदराबादला जा. खूप बस आहेत तिथून. ' (नशीब तो

स्टेशनमास्तर मराठी बोलणारा होता म्हणून मी त्याला काय बोलले आणि तो मला काय बोलला ते निदान आम्हाला एकमेकांना कळले तरी! )

त्याने दिलेला सल्ला अर्थातच मला मान्य नव्हता. एवढे सामान घेवून निजामबाद पर्यंत जायचे, तिथून पुढे बस. पुन्हा रेल्वे स्टेशन ते बस स्टँड. छे. . छे. . आणि आपण त्या गाडीने निघालो आणि तेवढ्यात देवगिरी आली तर? तिला क्रॉस करून ही पुढे जायची. शिवाय नांदेड सिकंदराबाद सेकंड ए. सी. चे तिकीट वाया जाणार. निजामबाद गाडीचे साधे तिकीट काढावे लागणार. बाप रे! सारखे काय करावे, कसे करावे असा जप चालला होता. बारा वाजले. देवगिरी लौकर येण्याची काहीच आशा उरली नाही आणि आता आली तरी आपण काही चेन्नई एक्स्प्रेसच्या वेळेपर्यंत पोंचत नाही, असे वाटू लागले. निखील, नमाला फोन करण्याचा प्रयत्न केला पण ती दोघे हॉस्पिटलमध्ये असल्यामुळे तो लागत नव्हता. शेवटी मी तिकीट वापस करायचे ठरवले. रिझर्वेशन काउंटर वर गेले तर तो काउंटर वरचा माणूस म्हणाला,

‘बाई या तिकिटाचे अर्धेच पैसे मिळतील. ’

मी म्हणाले, ‘गाडी वेळेवर आली नाही यात माझी काय चूक आहे? मला पुढे चेन्नईला जायचे आहे. इथूनच उशीर झाला तर काय उपयोग? मला माझ्या तिकिटाचे पूर्ण पैसे मिळाले पाहिजेत. ’

‘एक काम करा, ’ तो म्हणाला. त्यालाही माझे म्हणणे पटले. ‘गाडी जर तीन तासापेक्षा जास्त उशिरा आली तर पूर्ण पैसे मिळतात पण तुम्ही साहेबांकडून तसे लिहून आणा. ’

‘ठीक आहे. मी आणते तसे लिहून. ’ असे म्हणून मी निघाले. मी साहेबांकडे निघाले आणि तेवढ्यात गाडी येत असल्याची अनाऊंसमेंट झाली. पुन्हा मनाची चलबिचल. शेवटी ठरवले की जे होईल ते होवो जायचेच. चेन्नई गाडी चुकली तर रात्री सिकंदराबादलाच वेटिंग रूम मध्ये मुक्काम करायचा आणि दुसरे दिवशी सकाळीच नांदेडला परत यायचे. असा विचार करून, हिम्मत करून आणि देवाचे नाव घेवून गाडीत चढले. गाडीत चढले तर काय? वेगळेच दृश्य! गाडीत सगळीकडे काचा पसरल्या होत्या. नंतर समजले की गाडी उशिरा येण्याचे कारण म्हणजे जालना स्टेशनच्या जवळपास कुठेतरी गाडीवर दगडफेक झाली होती. आणि ए. सी. च्या डब्याच्या खिडक्यांच्या काचा फुटल्या होत्या. आतील लोकांना काही प्रमाणात मारही लागला होता. बारा वाजता गाडी नांदेड स्टेशनवर आली आणि सगळे लोक तिथे जमा झाले. पुढारी, बातमीदार, डब्यातल्या काचा साफ करायला आलेले कर्मचारी, रेल्वेतील अधिकारी, मार लागलेल्या लोकांना बघायला डॉक्टर आणि इतर बघे. मार लागलेल्या लोकांची विचारपूस, औषधपाणी, पत्रकार लोकांचे फोटो घेणे सुरु झाले. बारा वाजता आलेली गाडी साडेबारा वाजले तरी नांदेड स्टेशनवरच होती. माझा जीव सारखा खालीवर होत होता. सकाळपासून पोटात काही नव्हते. उठल्यावर फक्त

एक कपभर कॉफी घेतली होती. खाण्याचे बरोबर घेतले होते. नऊला गाडीत बसले की खायचे असा विचार केला होता. पण सगळेच बिघडले. काहीच सुचत नव्हते. शेवटी बारा पस्तीसला गाडी निघाली. गाडी हलल्यानंतर थोडा जीवात जीव आला. इच्छा नव्हती तरी थोडेसे खाऊन घेतले, कारण नाही खाल्ले तर पुन्हा त्रास आपल्यालाच होणार.

एक पहिला टप्पा तर पार पडला होता. आता सिकंदराबादला पोंचल्यानंतरचा दुसरा टप्पा. डोक्यात विचारांचा नुसता गोंधळ सुरु होता. काय होईल? कसे होईल? ही गाडी वेळेवर सिकंदराबादला पोंचेल का? ही गाडी तीन किंवा चार नंबर प्लॅटफॉर्मवर लागेल आणि चेन्नई गाडी एक नंबरवर असेल. सगळे सामान घेवून एक नंबरवर जायचे. कुली मिळेल का? आपल्याला पळता येईल का? का कुठे पडू? आपण तिथे पोंचलो आणि ती गाडी निघाली तर? एवढी धडपड करून चेन्नई गाडी नाही मिळाली तर? सारखे टेन्शन येत होते. मनात येणार हे विचार कुणाशी तरी बोलून बरे वाटेल म्हणून डब्यातल्या लोकांशी गप्पा मारायला सुरवात केली. कुणी म्हणे, ही गाडी जाईपर्यंत ती गाडी थांबवतील, त्यांना थांबवावीच लागेल, तुम्ही काळजी नका करू. तर कुणी म्हणे काही सांगता येत नाही. ही जर जास्तच उशिरा पोंचली तर ती गाडी कशी थांबेल? शिवाय डब्यातले वातावरणही वेगळेच होते. सगळीकडे काचा झाल्या होत्या, त्या झाडून कोपऱ्यात ठिकठिकाणी काचांचे ढीग जमा केले होते. मधून मधून स्टेशनवर गाडी थांबली की रेल्वेचे लोक, डॉक्टर येवून चौकशी करून जात

होते. फोनाफोनी चालूच होती. डब्यातील लोकांच्या घरच्यांचे काळजी करणारे फोन येत होते. मी आपली चिंतातूर होवून देवाचे नाव घेत बसले होते.

मी केलेला देवाचा धावा आणि रेल्वेच्या ड्रायव्हरचे कौशल्य याची बरोबर सांगड जमली आणि बरोबर पाच पन्नासला गाडी सिकंदराबाद स्टेशनवर पोंचली. मनातल्या मनात मी त्या वाहन चालकाला शतशः धन्यवाद दिले. माझ्याकडे दहा मिनिटे वेळ होता. मी डब्याच्या दारातच सामान घेवून उभी राहिले आणि जो कुली समोर दिसला त्याला पटकन सामान धरायला सांगून माझा चेन्नईचा गाडी नंबर, बोगी नंबर आणि सीट नंबर त्याला सांगितला. पैशाच्या बाबतीत बोलायला किंवा घासाघीस करायला वेळच नव्हता. दादरा चढून त्या कुलीच्या मागे पळत एक नंबरवर जातांना मी अक्षरशः धापा टाकीत होते. तो कुली बिचारा थोडा पुढे जायचा आणि पुन्हा माझ्यासाठी थांबायचा. एसीचा डबाही सगळयात पुढे इंजिन जवळ होता आणि इकडे उतरून येताना आम्ही गाडीच्या अगदी शेवटच्या टोकाला उतरलो होतो. पळत पळत कसाबसा एकदाचा तो डबा गाठला. कुलीने माझ्या सीट जवळ माझे सगळे सामान नीट लावून ठेवले. मी धापा टाकतच डब्यात चढले. कशीबशी माझी सीट पकडली आणि सुटकेचा नि:श्वास सोडला. समोरच बसलेल्या बाईने पटकन पाण्याची बाटली माझ्यासमोर धरली. धापा टाकीत आलेल्या माझ्याकडे सगळे लोक ‘बिचारी’ या अर्थाने बघत होते. कुलीने चाळीस रुपये मागितले. मी त्याला पन्नासची नोट दिली आणि बाकी तुझ्याकडेच राहू दे असे खुणावले. मी बोलण्याच्या मन:स्थितीत नव्हते, कारण अजून माझ्या धापा कमी झाल्या

नव्हत्या. तोही खूष झाला. मी शांत बसले आणि गाडी सुरु झाली. आत्ता कुठे मी निवांत झाले होते. नमाला फोन केला. आल्यावर सविस्तर बोलू म्हणून सांगितले. तिला हे सगळे काहीच माहित नव्हते कारण दुपारी आमचे बोलणे झाले तेव्हा गाडी लेट आहे एवढेच मी सांगितले होते. त्यातला गंभीरपणा तिला जाणवू दिला नाही. फोनवर बोलून झाल्यावर मी जेवण केले आणि आयपॉड काढून गाणी ऐकत शांत पडून राहिले. आता सकाळ पर्यंत, चेन्नई येई पर्यंत काही घोर नव्हता.

सकाळी सहा सव्वा सहा वाजता गाडी चेन्नईला पोंचली तर तिथे दुसरेच ताट वाढून ठेवलेले. स्टेशनवर उतरताच बघितले तर तिथे धुवांधार पाऊस. खालची वरची धार एक. नुसता दणदण आवाज येत होता. निखील, नमाला फोन केला होता आणि ते मला घ्यायला स्टेशनवर येणार होते, त्यामुळे असे घाबरल्यासारखे वगैरे काही झाले नाही. पण ते दोघे मोटरसायकलवर असल्यामुळे पावसात अडकून पडले होते. रेनकोट असले तरी वाहन चालवण्या एवढा पाऊस आटोक्यात नव्हता. फोनवर संपर्क होताच. नमाने मला सांगितले होते की तू जिथे आहेस तिथेच थांब. मी तिला माझा प्लॅटफॉर्म नंबर आणि एका फ्रूट शॉपची खूण सांगितली. तो पाऊस, ते वातावरण, स्टेशनवरचा तो कलकलाट (तोही वेगळया भाषेतला), प्रवाशांची ती धावपळ, लगबग, चहा कॉफी आणि इतर खाण्याच्या पदार्थांचे खमंग वास, या सगळयांचा मी मस्त आनंद घेत होते. पावसामुळे त्या वातावरणाला जी खुमारी आली होती ती काही

औरच होती. असा बराच वेळ गेला. पाऊस थांबायची काही चिन्हे दिसेनात. मी तिथेच एका नळावर तोंड धुतले. पावसाळी वातावरणामुळे कॉफीच्या दुकानावर लोकांची झुंबड उडाली होती. तशीच त्या गर्दीत जावून एक कप कॉफी घेतली. हे सगळे करत असतांनाच सामानाकडे लक्ष द्यायची कसरतही करावी लागत होती. मी त्या फ्रूट शॉपच्या जवळ जवळच घोटाळत होते. कारण ती दोघे आली तर चुकामुक व्हायला नको. तसे मोबाईल असल्यामुळे प्रश्न नव्हता. पाऊस मधूनच थांबल्या सारखा वाटायचा की पुन्हा एकदम जोर धरायचा. पाऊस थोडा थांबल्यासारखा वाटला की ती दोघे निघत आणि पुन्हा सुरु झाला की कुठेतरी थांबत. असा साधारण दोन अडीच तासांचा वेळ मी तिथे काढला. मजल दर मजल करीत ती दोघे एकदाची साडे आठ वाजता स्टेशनवर पोंचली. पाऊस चालूच होता. मग तिथेच कॅन्टीनमध्ये नाश्ता करून दहाच्या सुमारास आम्ही घरी पोंचलो.

चेन्नईचा आठ दिवसांचा कार्यक्रम ठरलेला होता. निखील आणि नमा दोघांनी पण सुट्टी घेतली होती. दोन दिवस पॉन्डेचरीला गेलो. तेथील अरविंदांची समाधी बघून मन कसे शांत झाले. तेथील समुद्र तर अगदी बघण्यासारखा आहे. समुद्रकिनारा अतिशय स्वच्छ. थोडासुद्धा कचरा कुठे दिसत नव्हता. सगळीकडे शांतता पसरली होती. शिवाय त्या दिवशी पौर्णिमा होती, त्यामुळे तर त्या सौंदर्यात आणखीच भर पडल्यासारखी वाटत होती. जोरजोरात उसळणाऱ्या त्या लाटा, त्यांचा फेस, त्यांचे ते उत्स्फूर्त संगीत आणि चांदीसारखे

चमचमणारे पाणी. किती वेळ आम्ही चालत होतो आणि किती वेळ तिथे बसलो तेच कळले नाही. मुंबईच्या बीचवरचा कलकलाट, अस्वच्छता आणि येथील शांतता आणि स्वच्छता याची मनात उगाच नकळत तुलना होवू लागली.

त्यानंतरचा एक दिवस तिरुपतीला गेलो. टुरिस्ट बस होती. सकाळचा नाश्ता, चहा, जेवण सगळे त्यांच्याकडेच होते. त्यामुळे आम्हाला फक्त जाणे आणि दर्शन घेणे एवढेच काम होते. प्रसादाचे लाडू सुध्दा त्याच माणसाने आणून दिले. त्यामुळे तिथे काहीही त्रास झाला नाही. दर्शन छान झाले. तेथील तुफान गर्दीला आणि चेंगराचेंगरीला मात्र तोंड द्यावे लागले. तिरुपतीहून आल्यानंतर एक दिवस चेन्नईला बाहेर खरेदी, जेवण यात गेला. आठ दिवस कसे गेले ते पण कळले नाही.

ठरल्याप्रमाणे दुसरे दिवशी संध्याकाळी मी तिथून निघाले. स्टेशनवर बसवून देण्यासाठी नमा आली होती. सकाळी सहा वाजता सिकंदराबादला पोंचले. नांदेडला जाण्यासाठी देवगिरी दुपारी दीड वाजता होती. तोपर्यंत भरपूर वेळ होता तो वेटिंग रूम मध्ये काढायचा होता. वेटिंग रुममध्ये सामान सगळे व्यवस्थित लावून ठेवले. तोंड धुवून फ्रेश झाले. थोड्या वेळाने कॉफी घ्यावी असा विचार केला. मला सिकंदराबाद स्टेशनवरची कॉफी खूप आवडते. आठ वाजून गेले तरी कुणाचा फोन आला नाही. आता आपणच नमाला फोन करून आपण पोंचल्याचे सांगावे आणि नंतर कॉफी घ्यावी असा विचार करून मी पर्स उघडली तर काय? पर्समध्ये मोबाइलच नाही. म्हणजे

मोबाइल हरवला का काय? सगळी पर्स शोधली. पण छे! मोबाइल काही सापडला नाही. आता मात्र मोबाइल हरवल्याची माझी खात्री झाली. काय करावे? मोठा प्रश्नच पडला. सगळे नंबर त्यातच स्टोअर केलेले होते. आणि महत्वाचे नंबर जरी मला पाठ असले तरी हातात फोन नसल्यामुळे त्याचा काय उपयोग होता? आता इथे स्टेशनवर मोबाइल कुठे शोधणार? मोबाइल गेला असे गृहीत धरून मी स्वस्थ बसले. कॉफी पिण्याचा पण मूड गेला. थोड्या वेळाने मनात पुन्हा विचार आला, असे स्वस्थ बसून राहण्यात काय अर्थ आहे? काहीतरी हालचाल करावी. तिथेच वेटिंग रूममध्ये बसलेल्या एका माणसाला मी विनंती केली,

‘भाईसाब, मै अभी चेन्नईसे आई हुं, मुझे दोपहरकी गाडीसे आगे जाना है| लेकीन मेरा मोबाइल शायद गुम हो गया है| आपके मोबाइलसे आप मेरा नंबर ट्राय करेंगे प्लीज? ’

त्या माणसाने त्याच्या मोबाइलवरून माझा नंबर लावला. तो एका माणसाने उचलला. त्यांचे दोघांचे तेलगुमधे काहीतरी बोलणे झाले. त्याने नंतर मला सांगितले की,

‘आपका मोबाइल जॉर्ज नामके एक स्टेशनमास्टरको मिला है| वो अभी प्लॅटफॉर्म नंबर टेनपर उनकी केबिन मे है| आप वहा जाके अपनी पहचान देके कलेक्ट कर सकती है|’

त्याचे ते बोलणे ऐकून मला खूपच आनंद झाला. सामान तिथेच साखळीने बांधून ठेवून मी माझ्या मोबाइल शोधण्याच्या मोहिमेवर निघाले. मी प्लॅटफॉर्म दहावर गेले. तिथे ना कोणती केबिन होती ना कुणी स्टेशनमास्तर. मला वाटले की तो टेन म्हणाला कदाचित ते तीन असेल, तो हिंदी बोलत होता. आपल्या ऐकण्यात चुकले असेल. मग मी तीन नंबरवर गेले. आणि असे करून मी सिकंदराबाद स्टेशनवरचे सगळे प्लॅटफॉर्म आणि त्यावर होत्या त्या सगळया केबिन बघितल्या. पण जॉर्ज नावाचा कुणीही स्टेशनमास्तर तिथे नव्हता. कुणी म्हणे की त्याने तुम्हाला खोटे सांगितले. तर कुणी म्हणाले की तो दुसऱ्या एखाद्या स्टेशनवर असेल. एकजण तर म्हणाला की या नावाचा कुणी स्टेशन मास्तर इथे नाहीच. शेवटी मी सिकंदराबाद स्टेशनवर असलेल्या पोलीस स्टेशन मध्ये माझा मोबाइल हरवला असल्याची तक्रार नोंदवायला गेले. पण ते माझी लेखी तक्रार घ्यायला तयार होईनात. आधी तुम्ही शोध घ्या असे त्यांनी मला सांगितले. नंतर मी पुन्हा एकदा दादरा चढून गेले आणि असेच एका कोणत्यातरी प्लॅटफॉर्मवर केबिन दिसली तिथे गेले. तिथे एक स्टेशन मास्तर बसले होते. त्यांना मी पुन्हा माझा सगळा इतिहास सांगितला. ते बिचारे चांगले होते. त्यांनी मला बसायला सांगितले आणि माझ्या मोबाइलवर कॉल केला. पुन्हा तो जॉर्ज नावाचा माणूस त्यांना बोलला. पुन्हा त्यांचे तेलगु मध्ये बोलणे झाले आणि त्यांनी मला सांगितले की ते जॉर्ज नावाचे स्टेशन मास्तर नामपल्ली स्टेशनवर एक नंबर प्लॅटफॉर्मवर असलेल्या केबिन मध्ये बसलेले आहेत. तुमचा मोबाइल त्यांच्या जवळ आहे. तुम्ही लौकर तिथे जावून घेवून या. त्यांची ड्युटी साडे अकरा पर्यंतच आहे.

बाप रे! आता आणखी एक नवीनच संकट आ वासून उभे राहिले होते. मला तेथील काहीच माहिती नव्हती. कसे जायचे? किती लांब आहे? सामानाचे काय करायचे? कुठे ठेवायचे? आपल्या गाडीच्या वेळेपर्यंत जावून येणे होईल का? असे कितीतरी प्रश्न मनात येत होते. पण आता नामपल्लीला जावून मोबाइल घेवून येणे हा एवढा एकच पर्याय माझ्याकडे होता. आत्तापर्यंत एवढी खटपट केली, थोडे यश मिळाले आता तर जावून मोबाइल आणायलाच हवा असे वाटू लागले. काहीजणांकडे चौकशी केली तर कुणी म्हणे, लोकल ट्रेनने जा, कुणी म्हणे बसने जा. काहीच कळेना.

वेटिंग रूम मध्ये सामान ठेवून घायला तिथला वॉचमन तयार नव्हता. शेवटी पुन्हा विचार केला की याला त्याला विचारण्यापेक्षा पोलीस स्टेशन मध्ये जावूनच नीट चौकशी करावी. त्या लोकांनी स्पष्ट सांगितले,

'मॅडम, आप ऐसा किजीये, आपका सब सामान लेके ऑटोसे नामपल्ली जाईये| ज्यादा दूर नही| जानेका सौ और आनेका सौ रुपया लगेगा | एक घंटेमे आप जाके आ सकती है|'

त्यांच्या बोलण्याने मला धीर आला आणि सगळे सामान घेवून आमची स्वारी सिकंदराबाद स्टेशनच्या बाहेर ऑटोच्या शोधात निघाली. त्या लोकांनी सांगितल्याप्रमाणे मी शंभर रुपये देवून नामपल्ली स्टेशनवर गेले. तिथे एक नंबरवर असलेल्या केबिनमध्ये गेले. तिथे जावून चौकशी केली तर समजले की जॉर्जची ड्युटी संपली होती आणि ते निघून गेले. तरी पण मी धीर सोडला

नाही आणि त्या केबिनमध्ये जे स्टेशनमास्तर बसले होते त्यांना भेटले. त्यांना पुन्हा माझा सगळा इतिहास सांगितला. आणखी एक गंमत, या स्टेशनमास्तर लोकांशी बोलतांना माझ्या इंग्लिश बोलण्याचा कस लागत होता. तिथे कुणाशीही बोलतांना मला इंग्लिश, हिंदी (तेही साउथ इंडियन स्टाईल मध्ये) असा द्राविडी प्राणायाम करावा लागत होता. तशी मी बऱ्यापैकी इंग्लिश बोलत होते. ऑफिसमध्ये, मिटींगच्या वेळेस बोलावे लागत असे. पण ते ऑफिसचे बोलणे वेगळे आणि हे दुसरे व्यवहारामधले बोलणे वेगळे. पण केली हिम्मत. (हीच पुढे आपल्याला अमेरिकेला जातांना उपयोगी पडणार आहे, हे लक्षात येत होते. खरे तर अमेरिकेचे प्रवास वर्णन लिहिण्यापेक्षा हे सगळे लिहिणे म्हणजे नमनालाच धडाभर तेल होत आहे. पण ही एवढी सगळी पार्श्वभूमी लिहिण्याचा उद्देश एवढाच की मी केलेला हा प्रवास आणि प्रत्यक्ष अमेरिकेला जाईपर्यंतचे पुढील सगळे प्रसंग असे होते की त्यापुढे माझी अमेरिकेचा प्रवास एकटीने करण्याची भीतीच निघून गेली. आणि एक वेगळाच आत्मविश्वास माझ्यामध्ये निर्माण झाला. )

त्यांनी मला इंग्लिशमधून बरेच प्रश्न विचारले. त्या सर्व प्रश्नांची उत्तरे मी समाधानकारक दिली असावीत. लौकरच आमचा हा सुसंवाद संपला आणि त्यांनी हळूच त्यांच्या ड्रावर मधून माझा मोबाइल काढून माझ्या हातात दिला. माझा हरवलेला मोबाइल मी जेव्हा माझ्या स्वतःच्या डोळयांनी बघितला तेव्हा मला अगदी कृतकृत्य झाल्यासारखे वाटले. माझे आत्तापर्यंतचे कष्ट, माझी

मेहनत फळाला आली होती. जगातील एखादी अप्राप्य वस्तू आपल्या हातात पडली आहे असे वाटले आणि अतीव समाधानाने मन भरून गेले. (फक्त डोळ्यातून आनंदाश्रू यायचे तेवढे बाकी राहिले होते. )

पुन्हा दुसरा ऑटो करून, त्याला शंभर रुपये देवून मी सिकंदराबाद स्टेशनवर आले. माझे मोबाइल मिशन यशस्वी झाले होते. बारा वाजले होते. दीड वाजता गाडी होती. वेळ भरपूर होता. सकाळी सहा वाजल्यापासून दीड वाजेपर्यंत वेळ कसा काढायचा हा प्रश्न पडला होता, तो आपोआपच सुटला. उलट वेळ कसा गेला ते पण कळले नाही. माझा चहा, नाश्ता सगळेच राहिले होते. मी पुन्हा सगळे सामान वेटिंग रूम मध्ये ठेवले. एखादी मोहीम फत्ते करून आल्यानंतरच्या विजयी वीरा प्रमाणे माझा चेहरा फुलला होता. कॅन्टीन मध्ये जावून मी नाश्ता केला, कॉफी घेतली. आणि पुढच्या प्रवासासाठी सज्ज झाले.

एकोणीस ऑक्टोबरला मी नांदेडला आले. दोन दिवस ऑफिसचे काम करून पुन्हा चोवीस तारखेला मुंबईला व्हिसा साठी जायचे होते. आता पुन्हा सुट्टी मागावी लागणार होती. तेवढ्यात तेवीस तारखेला मुंबईला मिटिंग असल्याबद्दलचा मेल आला आणि माझा जीव भांड्यात पडला. थोडेसे हायसे झाले. म्हणजे आता मला तेविसची मिटिंग अटेंड करून चोवीसला माझे व्हिसाचे काम करता येणार होते. शिवाय ऑफिसच्या कामासाठी जायचे म्हणून टी. ए. डी. ए. मिळाला असता तो वेगळाच.

ताबडतोब रिझर्वेशन केले. विशेष म्हणजे या वेळेस माझी सीट अपग्रेड होवून मला एचए1 मध्ये सीट मिळाली आणि माझा प्रवास अतिशय सुखाचा झाला. मिटिंग संपल्यानंतर नेहमी ठरल्याप्रमाणे मी आणि निलू चर्चगेटला भेटलो आणि दोघी मिळून घरी आलो. रात्री गिरीषने पुन्हा एकदा सगळी कागदपत्रे बघितली. आमचा सगळयांचा हा पहिलाच अनुभव असल्यामुळे कुणालाच काही माहित नव्हते. अमेरिकेला जावून आलेल्या बऱ्याच लोकांना मी त्याबद्दल विचारले पण प्रत्येकाचा अनुभव वेगळा होता. काही जणांना व्हिसा नाकारण्यात आला होता. पण माझा व्हिसा नाकारण्यात येणार नाही अशी आम्हाला खात्री वाटू लागली. कारण मला नोकरी होती. माझ्या दोन मुली भारतात होत्या. मला वापस येणे आवश्यक होते, म्हणजे मी येणारच होते. पण माझे जे जुने वीस वर्षांपूर्वीचे नेमणूक पत्र होते त्याबद्दल गिरीषला थोडी शंका वाटतच होती. मला मात्र सारखे धडधडत होते. कसे जायचे, काय करायचे वगैरे सगळी चर्चा रात्रीच झाली. तिथे इतर कुणाला प्रवेश नसल्यामुळे सोबत कुणी येण्याचा प्रश्नच नव्हता.

ठरल्याप्रमाणे मी आणि निलू सकाळी आठ वाजता लोकलने निघून महालक्ष्मी स्टेशनला उतरलो. मुंबईला लोकलने प्रवास म्हंटले की माझी घाबरगुंडीच उडते. बरोबरचे सामान कुणीतरी चोरेल ही भीती. असे वाटायचे की आपल्या हातातील महत्वाची कागदपत्रांची बॅग हिसकावून घेवून कुणी पळून गेले तर? मी ती बॅग निलूच्याच हातात दिली. महालक्ष्मीला उतरून, टैक्सी

पकडून आम्ही व्हिसाच्या ऑफिसमध्ये पोंचलो. तिने मला तिथे सोडले आणि ती तिच्या ऑफिसला निघून गेली. अमेरिकन एम्बसीचे दोन ऑफिस तिथे होते. पहिल्यांदा आम्ही जिथे गेलो तिथे वेटिंग हॉल होता. दोनशे पन्नास रुपये भरून तिथे थांबायचे. तिथे चहा, नाश्ता मिळायचा. ते पैसे गिरीषने आधीच भरून ठेवले होते. त्या हॉल मध्ये टी. व्ही. पण होता आणि त्यावर न्यूज चालू होत्या. शेअर मार्केट सारखे डाऊन होत होते आणि परत परत तेच दाखवत होते. मंदी चालू होती. डॉलरचा भाव वाढत होता. त्या दिवशी डॉलरचा भाव सगळयात जास्त म्हणजे पन्नास रुपये असा होता. का कोण जाणे पण मला एकूण वातावरण प्रतिकूलच वाटत होते. व्हिसाच्या इंटरव्ह्यू साठी दुसऱ्या ऑफिसमध्ये जावे लागायचे. त्यासाठी लोकांना तिथे घेवून जाण्यासाठी त्यांची गाडी असायची. वेळेप्रमाणे लोकांच्या बॅच असत. माझा नंबर येण्यासाठी वेळ होता. मला त्या दिवशी शुक्रवारचा उपास होता, त्यामुळे काही खायचे पण नव्हते. कॉफी घेण्याचीही इच्छा झाली नाही.

तिथे बसलो असतांना एका पुण्याच्या बाईची थोडी ओळख झाली. तिचा मुलगा इंजिनियर झाला होता. त्याचा व्हिसा काढण्यासाठी ती दोघे तिथे आली होती. त्या मुलाची आणि माझी इंटरव्ह्यूची वेळ एकच होती, साडे अकराची. सामान तिथेच लॉकर मध्ये ठेवले होते. आमच्या बॅचला नेण्यासाठी गाडी आली तेव्हा तेथील रिसेप्शनिस्टने सर्वांना तयार राहण्यास सांगितले. माझी पर्स लॉकर मध्ये ठेवली होती. मी त्या बाईंना विचारले, की तिकडे काही

पैसे लागतील का? तेव्हा त्या म्हणाल्या की तिकडे पैसे वगैरे काही लागणार नाहीत. मी पुन्हा एकदा त्या रिसेप्शनिस्टलाही पैशांबद्दल विचारले. तिनेही तेच सांगितले. ‘वहा पैसा वगैरे कुछ नही लगेगा. अपने अपने कागद संभालके लेके जाव. ’. मी थोडी निर्धास्त झाले. गाडी आल्यानंतर आम्ही सगळे त्या दुसऱ्या ऑफिसमध्ये जाण्यासाठी निघालो. तिथे पोंचल्यावरही माझी मन:स्थिती बैचैनच होती. आम्ही लाईनमध्ये उभे राहिलो आणि मला पहिला फटका बसला तो तिथेच. तेथील एका मुलीने मला लाईन मधून बाजूला केले. मला एकदम धसकन केले. बाकीचे लोक सगळे रांगेत पुढे जात होते, त्यांना टोकन मिळत होते. त्यांची फिंगर प्रिंट साठी लाईन लागत होती. आणि मी आपली हे सगळे बघत एका बाजूला उभी होते. थोड्या वेळाने त्या मुलीने मला सांगितले की तुमचा फोटो बरोबर आलेला नाही. आत्ताच्या आत्ता दुसरा काढून लावा. तिथे एक फोटोग्राफर बसलेलाच होता. तो ताबडतोब फोटो काढून प्रिंट काढून देत होता. मी त्याला जावून विचारले की किती पैसे लागतील? त्याने सांगितले दोनशे रुपये. हाय रे दैवा! मी तर माझी पर्स त्या आधीच्या ऑफिसमध्ये लॉकर मध्ये ठेवून आले होते. आता पुन्हा त्या ऑफिसमध्ये जा, लॉकर मधून पैसे काढा. शिवाय आत येताना सेक्युरिटी चेक होवून आत प्रवेश मिळाला होता. त्या ऑफिसमध्ये जायचे म्हणजे त्यांच्या गाडीप्रमाणे येणे, जाणे. सगळेच अवघड होवून बसले होते. माझ्या अंगातले अवसानच गेले. हातपाय गळून गेले. अंगाला दरदरून घाम सुटला. एक वाजून गेला होता आणि मी सकाळपासून पाणी सुध्दा प्याले नव्हते. आता काय

करावे? इथे आपल्या ओळखीचे कोण असणार? आणि मला एकदम त्या पुण्याच्या बाईच्या मुलाची आठवण आली. तो माझ्या बरोबरच लाईन मध्ये उभा होता पण आता बराच पुढे गेला होता. मी पटकन त्याला शोधून काढले आणि सरळ सरळ त्याला दोनशे रुपये मागितले. मी त्याला स्पष्ट सांगितले की माझा फोटोचा प्रॉब्लेम झालाय आणि सगळे लोक म्हणत होते की तिथे पैसे लागणार नाहीत, म्हणून मी माझी पर्स इथे आणली नाही. त्याला ते माहित होते, कारण त्याच्या समोरच मी हे त्याच्या आईला विचारले होते. मी असे पण म्हणाले की त्या ऑफिसमध्ये गेल्यावर मी तुमचे पैसे देवून टाकीन. त्या मुलाने मला पटकन दोनशे रुपये काढून दिले. खरे तर त्याचे उपकार मी जन्मभर विसरणार नाही. कसा बसा मी फोटो काढला. आपल्यासारखेच असे फोटो काढून घेणारे आणखी कुणी तिथे आहे का ते पण मी हळूच बघत होते म्हणजे तेवढाच मनाला दिलासा. पण त्यावेळी तरी तिथे तसे कुणी दिसले नाही.

झाले! एकदाचा फोटो मिळाला. मी तो त्या मुलीला दिला. तिने मला परत एका जागेवर बसायला सांगितले. ती मला म्हणाली तुमच्या नावाची अनाऊंसमेंट होईल तेव्हा तुम्हाला ज्या विंडोवर बोलवतील तिथे जा. मी तिथे बसले खरी, पण माझी सारखी चुळबुळ चालू होती. सर्वांना टोकन मिळाले होते. सर्वांच्या हातात ते टोकन आणि गुलाबी रंगाचा एक कागद होता. त्यांचा नंबर आला की ते व्हिसाच्या इंटरव्ह्यूसाठी ज्या विंडोवर बोलावले तिथे जात. त्या विंडोवर इंटरव्ह्यू घेणारे सगळे अमेरिकन बघून तर माझे धाबेच दणाणले होते.

ते काय बोलतील ते आपल्याला कळेल का? आपण काय बोलू ते त्यांना कळेल का? एकमेकांचे बोलणे नीट ऐकू येईल ना? का आपले काय. . ऊं. . आं. . असे करावे लागेल? रश्मीने फॉर्ममध्ये इंटरव्ह्यू साठी मराठी भाषाच दिली होती, ते तरी बरे झाले. नाहीतर आपल्या इंग्लिश बोलण्याचे चांगलेच वाभाडे निघायचे. माझे सगळे लक्ष त्या इंटरव्ह्यू देवून येणाऱ्या लोकांकडेच असायचे. कुणाला व्हिसा मिळे, कुणाला नाही. आतला माणूस पासपोर्ट हातात घेवून वापस आला की बाहेर बसलेले सगळे लोक हूं SSSSSSSS. . करून एक मोठा सुस्कारा सोडत. ज्यांना व्हिसा मिळाला ते हसत हसत बाहेर येत. बाहेर बसलेल्या प्रत्येकालाच उत्सुकता होती की आपले काय होईल? माझे तर अजून कशातच काही नव्हते. मी मधूनच दोनदा उठून जावून त्या मुलीला विचारले की माझे काय झाले? शेवटी ती माझ्यावर चिडली आणि मला म्हणाली, ‘तुम्हाला बसायला सांगितले ना, मग तुमचे नाव येईपर्यंत बसा तिथेच. ’ मी आपली मुकाट्याने बसून राहिले. शेवटी एकदाची तेरा नंबरच्या खिडकीवर येण्यासाठी माझ्या नावाची अनाउन्समेंट झाली. मी तेरा नंबरच्या खिडकीवर गेले. तिथे मला टोकन मिळाले आणि तो गुलाबी रंगाचा कागद पण मिळाला. तेथील मुलीने मला फिंगर प्रिंट साठी नंबर लावण्यास सांगितले. म्हणजे आत्ता कुठे माझी सुरवात झाली होती. फिंगर प्रिंट झाल्यानंतर मग मला व्हिसा इंटरव्ह्यूसाठी पुन्हा तिथेच बसून राहावे लागले. शेवटी अडीच वाजता माझा नंबर लागला. सात नंबरच्या खिडकीवर मला बोलावण्यात आले. एक छोटीशी

केबिन होती. तिथे आतमध्ये गेल्यावर मला थोडे हायसे झाले, कारण तिथे मी एकटीच होते, दुसरे कुणी नव्हते. उभे राहूनच मुलाखत द्यावी लागणार होती. त्यांचे बोलणे आपल्याला ऐकू येण्यासाठी आणि आपले बोलणे त्यांना ऐकू जाण्यासाठी समोर एक माईक होता. तो बघितल्यावर माझ्या शंकेचे निरसन झाले. तिथे एक दुभाषा होता. मी गेल्याबरोबर त्याने मला विचारले,

'तुम्ही कोणत्या भाषेत बोलणार? '

'मराठीत. ' मी सांगितले.

त्यांनी प्रश्न विचारण्यास सुरवात केली. अमेरिकन माणूस प्रश्न विचारायचा, तो दुभाषा तो प्रश्न मला मराठीत विचारायचा. खरे तर त्यांचे सगळे बोलणे मला कळत होते, पण त्या अमेरिकन माणसासमोर इंग्लिश मध्ये बोलायची माझी हिंमत होत नव्हती. शिवाय त्या अमेरिकन माणसाच्या कपाळावरील आठ्या आणि तिथले ते एकंदर वातावरण बघून मला सारखे असे वाटत होते की नको तो व्हिसा आणि नको ते अमेरिकेला जाणे. आपण आपले इथेच बरे. आमची प्रश्नोत्तरे झाली ती अशी,

'तुम्हाला अमेरिकेला कशासाठी जायचे आहे? '

'माझी मुलगी आहे तिथे, तिला भेटायला जायचय. '

'खर्च कोण करणार? '

'जावई'

'ते काय करतात तिथे? '

‘सिस्को कंपनीत इंजिनियर आहेत. ’

मुलगी काय करते? ’ त्यांना बहुतेक जावयाशी काही देणे घेणे नसावे.

‘एम. एस. ’

‘कुठल्या विषयात’

‘कॉम्पुटर सायन्स मध्ये’

‘तुम्हाला किती मुली आहेत? ’

‘तीन’

‘त्या काय करतात? ’

मुलींबद्दल त्यांनी विचारले मात्र, मी बोलायला लागले. ‘एक मुंबईला असते, सर्व्हिस करते. दुसरी चेन्नईला असते, ती डॉक्टर आहे. दोघींची लग्ने झाली आहेत. ’

खरे तर हे वाक्य मी बोलायला नको होते पण ते मला नंतर कळले. त्यांनी जेवढे विचारले तेवढेच उत्तर द्यायचे असते. त्यांनी मला मुलींची लग्ने झाली आहेत का असे थोडेच विचारले होते?

त्यांची प्रश्नांची सरबत्ती सुरूच होती.

‘घरी आणखी कोण कोण आहे? ’

‘माझ्या सासूबाई आहेत. म्हाताऱ्या आहेत. माझ्याजवळच असतात. ’

'मग आता तुम्ही अमेरिकेला गेल्यावर त्यांना कोण बघणार? '

'माझे दीर, जाऊ आहेत. '

'तुम्ही कुठे नोकरी करता? '

'बी. एस. एन. एल. मध्ये'

'बी. एस. एन. एल. म्हणजे काय? '

एवढी मोठी कंपनी, त्यांना माहित नाही? मला आश्चर्य वाटले. 'भारत संचार निगम लिमिटेड. मी तिथे अकौंटंस ऑफिसर आहे. '

'तुम्हाला पगार किती मिळतो? '

'महिन्याला पस्तीस हजार. '

'आता तुम्हाला जाण्यासाठी सुट्टी मंजूर झाली का? तसे तुम्ही लेखी लिहून आणले आहे का? '

'म्हणजे तशी तोंडी मंजूर झाली आहे. फाईल अजून प्रोसेस मध्ये आहे. मी तसे लेखी काही लिहून आणले नाही. ' मी बोलले खरी. पण आता माझा आत्मविश्वास हळू हळू डळमळीत होवू लागला. मनात म्हणाले, तुमची चार महिन्यांची सुट्टी मंजूर झाली आहे असे दोन महिने आधीच कोणत्या कार्यालयात लेखी लिहून देतील?

एवढे बोलून झाल्यावर तो अमेरिकन माणूस आत कुणाकडे तरी गेला. त्याने कुणाला तरी विचारले (बहुतेक त्याचे वरिष्ठ असतील) पस्तीस हजार

मंथली इन्कम आहे, व्हिसा द्यायचा का? मला तो दिसतही होता आणि काय बोलत होता तेही कळत होते.

थोड्याच वेळाने तो परत आला आणि मला सांगण्यात आले,

'सॉरी. तुमची आर्थिक परिस्थिती काही एवढी चांगली वाटत नाही, त्यामुळे आम्ही तुम्हाला व्हिसा देवू शकत नाही. ' त्यांनी लगेच कॉम्पुटर मधून तसे एक पत्र काढले आणि ते पत्र आणि माझा पासपोर्ट मला परत दिला. मी बाहेर आले. माझे डोके बधीर झाले होते. काय होत होते ते कळत होते पण डोक्यात शिरत नव्हते. बाहेर आल्यानंतर जेव्हा लोक माझ्याकडे बघू लागले तेव्हा एकंदर प्रकार माझ्या लक्षात आला आणि पुन्हा मी गलितगात्र झाले. एकदम थकून गेल्यासारखी तिथेच एका खुर्चीवर बसले. खरे तर मला व्हिसा मिळणे अतिशय आवश्यक होते. पण हे काय होवून बसले? आता कसे होईल? विमानाचे तिकीट तर काढून ठेवले होते. आणि रश्मीचे दिवसही जवळ येत चालले होते. अशा वेळी मी तिथे तिच्याजवळ असणे आवश्यक होते. लग्नाला दोन वर्षे होत आली होती आणि लग्न झाल्यावर ती अमेरिकेला गेली, त्यानंतर तर मी तिला बघितलेही नव्हते. गरोदरपणातले डोहाळे पुरवणे तर राहूच द्या, निदान बाळंतपणाच्या वेळी तरी तिच्या जवळ असणे आवश्यक होते. आणि मी हे काय करून बसले? मी या गोष्टीला एवढी घाबरले का होते? सुरवातीपासूनच माझ्या मनात सारखी नकारघंटा का वाजत होती?

थोड्याच वेळात मी भानावर आले. आता मला घरी बोरिवलीला वापस जायचे होते. एवढ्या लांब? तेही लोकलने. बाप रे! मी घड्याळात बघितले. तीन वाजत आले होते. पुन्हा त्यांच्या त्या बसने आम्ही त्या आधीच्या ऑफिसमध्ये आलो. ज्याच्याकडून मी पैसे घेतले होते तो पुण्याचा मुलगा आणि त्याची आई मला कुठे दिसली नाहीत. त्याला व्हिसा मिळाला किंवा नाही ते पण कळले नाही. सकाळपासून पोटात काहीच नसल्यामुळे कसेतरीच होत होते. मी तिथे एक कप कॉफी घेतली. लॉकर मधून माझी पर्स घेतली आणि सरळ टॅक्सी करून चर्चगेटला जाण्यासाठी निघाले. खरे तर समोरच महालक्ष्मीचे मंदिर होते पण तिथे जावून देवीचे दर्शन घेण्याचे पण मला सुचले नाही. टॅक्सीमध्ये बसल्यावर थोडे निवांत वाटले. आधी मी गिरीषला फोन केला. नंतर सगळ्यांना एस. एम. एस. केले. तिकडे रश्मी जागीच होती आणि माझ्याच निरोपाची वाट बघत होती. तिने सांगूनच ठेवले होते की कितीही उशीर झाला तरीही काय झाले ते मला सांग. माझा एस. एम. एस. मिळताच तिचा फोन आला. एकंदरीत सगळी परिस्थिती लक्षात येताच आम्हाला दोघीनाही रडायला येत होते. तिला वाटत होते, आपल्या डिलिव्हरीच्या वेळेस आई येते का नाही? आणि मला वाटत होते एवढ्या अडचणीच्या वेळेस आपण तिथे तिच्याजवळ नाही जावू शकलो तर? कसे होणार? मी तिला म्हणत होते टेन्शन घेवू नको आणि ती मला म्हणत होती टेन्शन घेवू नको. बघू काय करता येईल ते, असे म्हणून तिने फोन ठेवला. रस्त्यात तो टॅक्सीवाला काहीतरी बडबड करत होता, तर मी त्याच्यावरच

चिडले आणि माझ्या खास हिंदीत त्याला म्हणाले, ‘तुम्हे पता नाही है क्या चर्चगेट स्टेशन किधर है? तुम्हे मालूम होना चाहिये की कैसे जाना है, किधरसे जाना है. मैने एक बार बताया ना की मुझे चर्चगेट स्टेशन छोड दो, तो बस वहा छोडनेका. ’ तो बिचारा गप्प बसला. त्याच्या लक्षात आले असावे की माझा मूड चांगला नसावा. त्याने मला चर्चगेटला सोडले आणि मी बोरिवलीची स्लो लोकल पकडून घरी आले.

शुक्रवारचा उपास चांगलाच घडला होता. घरी येईपर्यंत पाच वाजले होते. जेवण्याची इच्छा नव्हती. घरात उपासाचे काही तयार नव्हते. गिरीषने लगेच उपासाचा वडा आणि थालीपीठ मागवले. चहा केला. खाणे झाल्यावर थोडे बरे वाटले.

रात्री निलू आली. जेवणे आटोपली पण तो विषय काही माझ्या मनातून जात नव्हता. मी खूप म्हणजे खूपच नाराज झाले होते. मनात सारखे तेच विचार यायचे. असे कसे झाले? आणि आता पुढे कसे होणार? निलू, मी, गिरीष त्या लोकांनी विचारलेल्या प्रश्नांची उजळणी करत होतो. त्यांनी मला खूपच प्रश्न विचारले होते.

‘मला तुमच्या त्या नेमणूक पत्राबद्दल शंका वाटतच होती. ’ गिरीष म्हणाले.

'आणि आई, तू असे का म्हणालीस की माझ्या सगळ्या मुलींची लग्ने झाली आहेत म्हणून. त्यांनी तुला तसे विचारले होते का? '

'नाही गं. पण मी बोलून गेले. ' मी म्हणाले.

'शिवाय असे पण सांगायला नको होते की घरी सासूबाईंना बघायला दीर जाऊ आहेत म्हणून. त्यामुळे काय झाले की, त्या लोकांना वाटले तू भारतात परत येणारच नाहीस. तिथेच राहशील. '

'थोडक्यात काय तर त्यांना असे वाटले की तुमची आर्थिक परिस्थिती चांगली नाही' गिरीष म्हणाले, 'आपण इथे काही मालमत्ता आहे असे पण दाखवले नाही. म्हणजे तुम्हाला इथे काहीच जबाबदारी नाही. भारतात परत यावे असे काही जबरदस्त कारण त्यांना सापडले नाही. '

'खरंच. चुकलेच माझे. पण आता काय करायचे? ' मी म्हणाले.

'जावू दे गं आई. होईल काहीतरी. टेन्शन नको घेवू. आणि तिकडे बाळंतपण करणे तसे सगळे सोपे असते. निघेलच न काही ना काही तरी मार्ग. ' निलू माझी समजूत काढत होती.

पण मला मात्र सारखे असे वाटत होते की मी सारखा नकारात्मक विचार करत होते त्यामुळेच असे झाले. त्यातल्या त्यात एक बरे झाले होते की तिरुपतीला जावून बालाजीचे दर्शन घेवून आल्यामुळे मनाला समाधान वाटत होते. नाहीतर असे वाटत राहिले असते की बालाजीचे दर्शन नाही घेतले म्हणूनच असे झाले.

दुसरे दिवशी सकाळीच रश्मीचा फोन आला. ती म्हणाली,

‘आई, तू टेन्शन नको घेवू. आपण पुन्हा पंधरा दिवसांनी अर्ज करू शकतो. मी पुन्हा ऑन लाईन फॉर्म भरते. तू लगेच एच. डी. एफ. सी. मध्ये पैसे भरून पावती घेवून ठेव. तू डिसेंबर मध्ये येणार आहेस. अजून अवकाश आहे. आपल्याजवळ एक महिना आहे. नोव्हेंबरच्या तिसऱ्या आठवड्यात जरी पुन्हा एकदा व्हिसाचा इंटरव्ह्यू झाला तरी तू येवू शकतेस. काळजी नको करू. ’

मी तिला धीर द्यायच्या ऐवजी तीच मला धीर देत होती. गिरीषने लगेच एच. डी. एफ. सी. मध्ये पैसे भरून पावती आणून ठेवली. आणि मग आता पुढे काय काय करावे लागेल याची चर्चा सुरु झाली. काय काय कागदपत्रे लागतील त्याची एक यादी केली. यावेळी व्हिसा नाकारल्या जाणारच नाही याची आम्ही काळजी घेत होतो. आता मात्र अजिबात हलगर्जीपणा करायचा नाही आणि नकारात्मक विचार तर मनात मुळीच आणायचे नाहीत असे मी ठरवले.

धनत्रयोदशीच्या दिवशी मी नांदेडला परत आले आणि जोमाने कामाला लागले. रोज नेटवर चेक करणे चालू असायचे. व्हिसा मिळालेल्या, न मिळालेल्या लोकांचे व्ह्यूज बघायला मिळाले. शिवाय आपल्या ओळखीचे जे कुणी अमेरिकेला जावून आले त्या सर्वांना विचारून झाले. मालमत्तेची कागदपत्रे, वापस येण्याविषयीचे डिक्लेरेशन नोटरी करून घेतले. शिवाय साहेबाना भेटून सुट्टी मंजूर करून घेतली, तसे लेटरही ऑफिसमधून घेतले. वार्षिक उत्पन्नाचे एक

लेटर घेतले. रश्मी, सारंगनेही काही कागदपत्रे पुन्हा तिथून पाठवली. सतरा नोव्हेंबर ही तारीख घेतली. सगळी कागदपत्रे गिरीषकडे पाठवली. त्यांनी ती नजरेखालून घातली. यावेळी त्यांचेही समाधान झाले. मागच्या वेळेस प्रमाणे याही वेळेस त्यांनी ती कागदपत्रे व्हिसाच्या ऑफिसमध्ये पाठवली आणि दोनशे पन्नास रुपये भरून एक दिवसाची तिथे वेटिंग रूम मध्ये थांबण्याची आणि चहा नाश्त्याची पावती घेतली. या वेळी मात्र आपला आत्मविश्वास अजिबात गमवायचा नाही याची खूणगाठ मी मनाशी पक्की बांधली.

एकीकडे हे कार्यालयीन कामकाज चालू होते, तर दुसरीकडे जाण्याची तयारी. बाळंतपणासाठी जायचे होते. अमेरिकेतील बाळंतपण. कसे असेल? काय करावे लागेल? आपल्या इकडची घरगुती औषधे तिकडे देता येतील का? त्यांचे डॉक्टर काय म्हणतील? पण मुळात ती औषधे आपल्याला इथून सामानात नेता येतील का? कुणाला विचारले तर आणखीच पंचाईत. कुणी म्हणे घेवून जा, काही होत नाही. तर कुणी म्हणे, नको, आपल्या बॅगेत चेकिंग मध्ये सापडली तर? कस्टमच्या लोकांनी ऑबजेक्शन घेतले तर? प्रॉब्लेम होईल.

या वेळी इंटरव्ह्यूला जाण्याआधी कंधारला जावून महाराजांचे, माझ्या गुरुंचे दर्शन घ्यायचे आणि त्यांचा आशीर्वाद घ्यायचा असे ठरवून मी एक दिवस कंधारला गेले. मी कंधारला असतांनाच कागदपत्रे पोंचल्याचा गिरीषचा फोन आला. थोडे बरे वाटले.

अशा एकंदर गोंधळलेल्या मन:स्थितीतच सतरा नोव्हेंबरच्या व्हिसाच्या मुलाखतीला दुसऱ्यांदा मी मुंबईला जाण्यासाठी निघाले. या वेळी मी बरीच उत्साहात होते. नकारात्मक विचार मनात आणायचाच नाही असे ठरवले होते. एकदा नापास झाल्यावर पुन्हा परिक्षेला बसण्याचा अनुभव घेत असल्यासारखे वाटत होते.

या वेळी मात्र सकाळी लोकलने न जाता गाडी करून जायचे ठरवले. त्याप्रमाणे गिरीषने गाडी सांगितली. साडे अकरा वाजता मुलाखत होती. गाडी सकाळी आठलाच आली. बोरिवलीहून महालक्ष्मीला जायचे होते. सकाळची ट्राफिकची वेळ होती. तरी मुलाखतीच्या वेळेपर्यंत पोंचू असा अंदाज होता.

सव्वा आठला मी घरातून बाहेर पडले. सगळे काही व्यवस्थित बरोबर घेतले आहे याची खात्री करून घेतली. गाडीत बसल्यावर मी ड्रायव्हरला विचारले,

‘तुम्हारा नाम क्या है? ’

‘राजकुमार’ त्याने सांगितले.

‘देखो राजकुमार, हमे वो महालक्ष्मी मंदिरके सामने व्हिसाका ऑफिस है ना वहा जाना है. तुम्हे मालूम है ना? ’

‘हां मॅडम, मुझे वो मंदिर मालूम है. ’ तो म्हणाला.

‘ठीक है फिर. मुझे वो ऑफिस मालूम है. चलो. ’

आणि मी राजकुमार बरोबर माझ्या मोहिमेवर निघाले. सांताक्रूझपर्यंत गाडी व्यवस्थित आली. ट्राफिक नेहमीप्रमाणेच जाम होत होती. गाडी हळूहळू चालत होती, पण आमच्याजवळ वेळ भरपूर असल्यामुळे टेन्शन येत नव्हते. बांद्र्यापर्यंत आलो आणि तेवढ्यात भर रस्त्यात, ट्राफिकमध्ये गाडी बंद पडली. माझ्या छातीत एकदम धसकन झाले. आता काय करायचे. मधेच भर रस्त्यात हा प्रकार झाला. चोहोबाजूंनी गाड्या. मागचे लोक जोरजोरात हॉर्न वाजवत होते. मी राजकुमारवर भडकले.

'क्या है ये? ऐसे कैसे हुआ? गाडी कैसे बंद पड गई? '

'गाडी का क्या भरोसा मॅडम, बंद पड गई तो मै क्या करू? '

त्याच्या या उत्तराचा मला आणखीच राग आला. मी म्हणाले,

'निकलते समय देखा नही क्या? हमारी सुविधाके लिये गाडी ली है, ऐसा प्रॉब्लेम करनेके लिये नही. अभी इतने जरुरी काम के लिये जा रहे है, टाईम पर नही पहुंचे तो क्या होगा? '

मी रागारागातच माझ्या खास हिंदीत बडबड करत होते. मी घड्याळात बघितले. तसा वेळ होता पण रिस्क घेणे अवघड होते. मला वेळेवर पोंचणे आवश्यक होते. एकदा वाटले तिथेच मध्ये उतरून एखादी टॅक्सी पकडावी किंवा बस. पण तिथे हायवे वर कुठे उतरणार? आणि टॅक्सी, बस नाही मिळाली तर? काय करावे? माझा जीव नुसता खालीवर होत होता. राजकुमारने हळूहळू गाडी एका साईडला घेतली. तो खाली उतरला आणि मला म्हणाला,

‘मॅडम, इसको धक्का देना पडेगा’

मी एकदम गारच पडले. मी आणि धक्का? तेही मुंबईच्या या भर रस्त्यात? हायवेवर? एकदा वाटले प्रयत्न करून पाहायला काय हरकत आहे? पण माझा जोर तो काय पडणार? आणि मी धक्का मारतानाचे ते दृश्य डोळ्यासमोर येवून त्याही परिस्थितीत मला हसू आले. या राजकुमाराने माझ्यावर अशी वेळ आणली होती. रागावलेल्या मला हसताना बघून त्याच्या चेहऱ्यावरचा ताणही थोडा सैल झालेला दिसला.

रस्त्यावर उभा राहून तो येणाऱ्या जाणाऱ्या प्रत्येकाला धक्का मारण्यासाठी विनंती करू लागला. पण कुणी ढुंकूनही बघायला तयार नव्हते. उलट येणारे, जाणारे सगळे लोक मधेच थांबलेल्या त्या गाडीला आणि त्यात बसलेल्या मला बघत होते.

शेवटी मी खाली उतरले. एक दोन मुले जात होती. मी त्यांना विनंती केली,

‘भाईसाब, जरा हेल्प करो ना. मुझे टाईमपे पहुंचना है. बहोत जरुरी काम है. प्लीज. . . ’

माझ्या विनंतीला मान देवून त्यांनी गाडीला धक्का मारायला मदत केली. आणि एकदाची गाडी चालू झाली. माझा जीव भांड्यात पडला. दादरच्या

पुढे थोडी ट्राफिक कमी झाली. आणि कशी बशी अकरा वाजता आमची स्वारी व्हिसाच्या ऑफिसमध्ये पोंचली.

या वेळेस मला कुठलाही वार नव्हता. त्यामुळे तिथे गेल्यावर चांगले खायचे, प्यायचे असे मी ठरवले होते. मागच्या वेळेसची फजिती बघून घरून काहीतरी खाऊन निघण्याचा आग्रह निलू आणि गिरीष यांनी केला होता. पण एकतर सकाळी सकाळी एवढ्या घाईत खावेसे वाटत नव्हते आणि मला वाटले आपल्याला तिथे पोंचल्यावर भरपूर वेळ मिळेल. आपण आरामात खाऊ. दुसरी वेळ असल्यामुळे थोडी भीड चेपली होती. शिवाय खाण्याचे वेगळे अडीचशे रुपये भरले होते. तेही वसूल करायचे होते. मागच्या वेळी त्या तेवढ्या अडीचशे रुपयांमध्ये मी फक्त एक कपभरच कॉफी घेतली होती.

पण आता आल्यावर बघितले तर वेळ खूपच कमी होता. मी पटकन एक सैंडविच घेतले. ते कसेबसे संपवले. आणि कॉफी हातात घेतली तो साडेअकरा वाजताच्या लोकांनी चला, असा पुकारा झाला. गरम गरम कॉफी मी तशीच घशात घातली आणि निघाले.

यावेळी पहिल्यासारखी भीती वाटत नव्हती. थोडे पैसेही जवळ फाईलमध्ये घालून ठेवले. (पण यावेळी काम पडले नाही). फोटोचा प्रश्नच नव्हता. कारण मागच्या वेळी तिथेच काढलेला फोटो यावेळी फॉर्मवर लावला होता. कागदपत्रही सगळे व्यवस्थित तयार होते. मागच्या वेळी त्यांनी काहीच

कागदपत्र बघितले नव्हते. यावेळीही जर त्यांनी काहीही कागदपत्र बघितले नाही आणि व्हिसा नाकारला तर ते सर्व त्यांना दाखवायचेच असे माझे आणि गिरीषचे ठरले होते. माझ्या आधी एकदोघांना व्हिसा नाकारला तेव्हा मात्र मला टेन्शन येवू लागले. पण मोठ्या निग्रहाने मी मनातील नकारात्मक विचार काढून टाकत होते. दिवस भरत आलेल्या रश्मीचा चेहरा माझ्या डोळयासमोर येत होता. मागच्या वेळेसपेक्षा या वेळेस गर्दी कमी होती. माझा नंबर लौकर लागला. यावेळी दुभाषाचे काम करणारी एक मुलगी होती. ती खूप गोड होती आणि तिचा चेहरा हसरा होता. मुलाखत घेणारा तो अमेरिकन मुलगाही छान हसऱ्या चेहऱ्याचा होता. त्याच्या कपाळावर आठ्या बिठ्या काही नव्हत्या. या वेळेस त्या मुलीने थोडी गुगली टाकलीच. मी मराठी भाषा मुलाखतीसाठी देवूनही तिने मला हिंदीमध्ये प्रश्न विचारायला सुरवात केली. सुरवातीला मी सटपटलेच. पण एकदम सावरले. कसाही का असेना पण मला हिंदी बोलण्याचा सराव होता.

‘आप अमेरिका क्यूं जाना चाहती हो? ’ तिने मला पहिला प्रश्न विचारला.

मी सावध होते. मी म्हणाले,

‘मेरी बेटीने मुझे वहां ख्रिसमसके लिये इन्व्हाईट किया है. ’ मागच्या वेळी मी मुलीला भेटायला जायचय असे म्हणाले होते. त्यात बदल केला.

ख्रिसमस जवळ आला होता. तो त्यांचा मोठा सण, आपल्या दिवाळीसारखा. साहजिकच त्या सणासाठी कुणी आपल्या देशात बघायला जाणार म्हणजे त्यांना बरेच वाटणार. ते थोडे सेंटी होत असतील. ही सगळी आपली माझ्या (भाबड्या) मनाची समजूत.

'यहां कौन है? ' दुसरा प्रश्न.

'मेरी बेटी' माझे थोडक्यात उत्तर.

'क्या करती है? '

'जॉब करती है'. पुन्हा तसेच, थोडक्यात.

मला वाटले, आता ही आणखी काय काय विचारणार? मी कागदपत्र दाखवण्याच्या तयारीतच होते. आणि आणखी काही विचारले तर थोडक्यात उत्तर द्यायचे असे ठरवत होते. तेवढ्यात ती मुलगी म्हणाली,

'तुम्हाला व्हिसा मिळाला आहे, तुम्ही जाऊ शकता. '

माझा माझ्या कानांवर विश्वासच बसेना. पण खात्री करून घेण्यासाठी मी पुन्हा एकदा विचारले,

'काय म्हणालात? '

ती पुन्हा शुध्द मराठीत म्हणाली,

'तुम्हाला व्हिसा मंजूर झाला आहे. व्हिसा आणि पासपोर्ट उद्या तुमच्या घरी पाठवण्यात येईल. तुम्ही जाऊ शकता. '

एखादी मोठी लढाई जिंकल्यासारखा मला आनंद झाला. त्या दोघांचेही आभार मानून मी बाहेर पडले. बाहेर बसलेले लोक माझ्या चेहऱ्याकडे बघून काय समजायचे ते समजले.

यावेळेस गाडी होती म्हणून मी थोडी सैल झालेली होते. महालक्ष्मी मंदिरात जावून दर्शन घेवून आले. राजकुमारला फोन करून बोलवून घेतले. रश्मीला एस. एम. एस. केला. आजही रिझल्ट काय लागणार या काळजीत ती दोघेही तिकडे जागीच होती. गिरीषलाही फोन केला. इतरांनाही फोन, मेसेज केले. सगळयांनाच आनंद झाला होता.

आता मात्र पूर्णपणे जाण्याचे वेध लागले. यावेळी नांदेडला जातांना औरंगाबादला उतरले. मनोज न्यू इंडिया एशुअरन्सचे काम करत असल्यामुळे तिथेच मेडिकल इन्श्युरन्स काढायचे ठरवले. त्यासाठी मेडिकल चेकअप करणे आवश्यक होते. खरे तर मला आत्तापर्यंत काहीच आजार नव्हता पण मेडिकल चेकअप मध्ये बी. पी. आणि शुगर निघाली. त्यामुळे पुन्हा एकदा टेन्शन आले. पण आता त्याला काही इलाज नव्हता. डॉक्टर कडे जावून औषध घेणे आणि तब्येत आटोक्यात ठेवणे आपल्या हातात होते.

तिथे माझी मावस बहिण अनघा नेवपूरकर हिने माझा एक प्रश्न सोडवला. मी काही घरगुती औषधे बरोबर घेवून जाणार होते. त्यावर कस्टम मध्ये काही ऑब्जेक्शन येईल का असा विचार माझ्या मनात येत होता. त्याबद्दल

मी तिला विचारले. तेव्हा तिने सांगितले की ती सगळी औषधे आयुर्वेदिक असतात. तुमच्या इतर औषधांसाठी जसे तुम्ही डॉक्टरांचे प्रिस्क्रिप्शन ठेवता तसेच या औषधांसाठी पण डॉक्टरांचे एक प्रमाणपत्र ठेवायचे. आम्ही आमच्या पेशंटना ते देतो. तुला पाहिजे असेल तर तुला पण तसे देईन. तू काय काय सोबत घेवून जाणार आहेस ते मला सांग. '

औरंगाबादला असतांना आणखी एक महत्वाची गोष्ट घडली. ती म्हणजे सुनिलरावांचे आतेभाऊ श्री. काटे, जे अमेरिकेतच स्थायिक झाले होते, ते त्याच वेळी भारतात आलेले होते. त्यांच्याशी फोनवर बोलणे झाले. त्यांनी पण बऱ्याच गोष्टी सांगितल्या. त्यांनी मला विचारले, तुम्ही कसे जाणार? मी सांगितले, डेल्टा एअर लाईन्सची फ्लाईट आहे. मला अटलांटाला विमान बदलावे लागणार आहे. आणि मला एकदम आठवले की मी एकदा पेपरमध्ये वाचले होते की अटलांटाचे विमानतळ हे जगातील सर्वात मोठे विमानतळ आहे. तिथे एका टर्मिनलहून दुसऱ्या टर्मिनलवर जाण्यासाठी ट्रेन असते. त्या कल्पनेनेच माझा जीव कधी कधी खालीवर व्हायचा. मला आपले सगळे सामान हातात घेवून लोंबकळत जाणारी माझीच छबी दुसऱ्या टर्मिनलवर जाण्यासाठी ट्रेन पकडायला जातांना दिसत होती. आणि माझ्याच चेहऱ्यावरचे ते वेंधळेपणाचे भाव मला दिसत होते. (विमानात बसल्यावर सामानाची आपल्याला काही काळजी नसते ही कल्पनाच अद्याप मनात रुजली नव्हती. ) तर मी माझ्या मनातली ही शंका त्यांना विचारली. त्यांनी सांगितले, 'ट्रेन असते हे खरे आहे, पण ती आपल्या

इकडच्या ट्रेन सारखी नसते. ती ग्राउंड फ्लोअरला असते आणि सारखी गोल फिरत असते. विशेष म्हणजे त्या ट्रेनला ड्रायव्हर, कंडक्टर असं कुणी नसतं. त्याचे दरवाजे आपोआपच उघडतात आणि बंद होतात. (म्हणजे अजूनच टेन्शन. ) पण निदान माहिती तरी मिळाली. त्यांनी आणखी हे पण सांगितले, अटलांटा आणि सॅनफ्रानसिस्को हा साडेचार ते पाच तासाचा विमानाचा प्रवास आहे. अटलांटाला थंडी खूप जास्त असते पण तुम्हाला एयर पोर्टच्या बाहेर जाण्याची आवश्यकता नसल्यामुळे काही त्रास होणार नाही. अटलांटा आणि सॅनफ्रानसिस्कोच्या घड्याळात तीन तासाचा फरक आहे. अटलांटाचे घड्याळ तीन तास पुढे असते. हे ऐकून मला गंमत वाटत होती पण एकीकडे टेन्शनही येत होते. त्यांनी पुन्हा हेही सांगितले की विमानात बसल्यावर घशाला कोरड पडते. त्यामुळे सारखे पाणी पीत राहा. प्रवासासाठी त्यांनी मला शुभेच्छा दिल्या.

या सर्व गोष्टींमुळे माझ्या मनावरचे बरेच मोठे ओझे दूर झाले. एकंदरीत अशा प्रसन्न मन:स्थितीतच मी नांदेडला पोंचले. नांदेडला पोंचल्यावर रेल्वे स्टेशनवरून घरी जातांना थोडा प्रॉब्लेम झालाच. सामान घ्यायला कुली केला होता आणि मी त्याच्या मागून चालत जात होते. पण दादरा उतरतांना माझा पाय सर्रकन घसरला. मी बरीच खाली आले. पण डाव्या हाताने मी दादऱ्याचा कठडा गच्च धरून ठेवला होता तो हात तसाच वर राहिला. त्यामुळे माझ्या डाव्या हाताला खांद्याच्या ठिकाणी खूपच जोरात हिसका बसला. माझा डावा हात खूपच दुखायला लागला. आधीच मेडिकल टेस्ट मध्ये बी. पी. आणि

शुगर निघाली होती त्यात आणखी पुन्हा हे हाताचे दुखणे. पण मी हे हाताचे दुखणे कुणालाच सांगितले नाही. थोडे आयोडेक्स वगैरे लावून तसेच सहन केले. मनातल्या मनात देवाला प्रार्थना मात्र करत होते की, आता तरी काही अडथळा आणू नको रे देवा.

सहा डिसेम्बरचे विमानाचे तिकीट होते. पुन्हा मुंबईला जाण्यासाठी दोन डिसेंबरचे रिझर्वेशन करून ठेवले. आता तयारीला दिवस कमी पडत होते. तेवीस किलोच्या प्रत्येकी दोन सूटकेस म्हणजे शेहेचाळीस किलो आणि वर नऊ किलो पर्यंतची एक केबीन बॅग, एवढे सामान बरोबर नेता येणार होते. रश्मीला देण्याची आयुर्वेदिक औषधे घेतली. अनघाने तिचे प्रमाणपत्र पाठवले, तसेच मनोजने इन्शुरन्सचे पेपर्स पाठवले. डॉक्टर कडे जावून एकदा चेकअप करून घेतले. शुगर आणखी वाढली होती. तुमची ही शुगर टेन्शनची आहे, काळजी करू नका असा धीरही त्यांनी दिला. गोळ्या लिहून दिल्या. म्हणजे आता रोज आठवण ठेवून दोन्ही वेळा गोळ्या घेण्याचे आणखी एक काम वाढले होते.

दरम्यान एक अतिशय काळजाचा थरकाप उडवणारी घटना घडली. 26-11-2008 ला पाकीस्तानच्या लष्कर-ए-ताएबाने मुंबईवर बॉंब हल्ला केला. त्यांनी एकंदर बारा ठिकाणी बॉंब टाकले. संपूर्ण भारताच्या आणि महाराष्ट्राच्या ईतिहासाला हादरवून टाकणारी ही घटना सगळयांच्या ह्रदयाचा थरकाप उडवणारी होती. मुंबईमधे छत्रपती शिवाजी टर्मीनस, ओबेरॉय हॉटेल, ताजमहाल हॉटेल, कामा हॉस्पिटल, नरीमन हाऊस, मेट्रो सिनेमा आणि सेंट

झेवियर का ॅलेज ई. ठिकाणी 26 ते 29 नोव्हेंबर या काळात हे बाँब स्फोट झाले. एकूण एकशे चौसष्ट लोक मारले गेले आणि तीनशेच्या वर जखमी झाले.

या हल्ल्यामधे विजय साळसकर, (Sr. Police Inspector), हेमंत करकरे (Chief of Mumbai Anti Terriorist Squad) आणि अशोक कामटे (Additional Commissionar of Mumbai Police) हे शहीद झाले.

सगळीकडे दहशतीचे वातावरण होते.

गाड्या बंद होत्या. एरव्ही गजबजलेले असणारे सी. एस. टी. स्टेशन सुनसान आणि भकास वाटू लागले. मुंबईला जाण्याची भीती वाटू लागली. विमानतळ उडवण्यात येणार असल्याच्या अफवा पसरत होत्या. माझा जीव भीतीने थोडा थोडा होत होता. पण महाराजांचे आशीर्वाद माझ्या पाठीशी होते त्यामुळे सर्व काही व्यवस्थित होईल याची खात्री होती.

दोन डिसेंबरचे माझे मुंबईला जाण्याचे तिकीट होते. तोपर्यंत दहशतीचे वातावरण थोडे निवळले होते पण लोकांच्या मनातली भीती कमी झाली नव्हती. माझ्या बहिणीची मुलगी तिथेच सेंट जॉर्जला होस्टेलवर रहात होती. त्या मुलींनी प्रत्यक्ष गोळयांचे आणि लोकांचे ओरडण्याचे आवाज ऐकले होते. तिला फोन करून आम्ही वातावरणाचा अंदाज घेत होतो.

शेवटी नांदेडहून मुंबईला जाण्याचा दिवस आला. घरातली सर्व आवराआवर केली. भास्कर भावजी आणि भावना सर्व काही व्यवस्थित बघत

असल्यामुळे मला घरची काही काळजी नव्हती. सर्वांचा, सासूबाईंचा निरोप घेतांना रडू आले. आपण कुठे तरी खूप दूर दूर जात आहोत असे वाटू लागले. त्यानाही वाईट वाटत होते पण माझे जाणेही तेवढेच आवश्यक होते. मला तर जाण्याचे ठरल्यापासूनच सारखे वाईट वाटत होते. मनात सारखा विचार यायचा की आज रश्मीचे बाबा असते तर आम्ही दोघे मिळून गेलो असतो. पण आत्तापर्यंतचा चोवीस वर्षांचा आयुष्याचा प्रवास एकटीनेच केला होता. तर या प्रवासाचे काय? त्यांची उणीव प्रत्येक प्रसंगातच जशी प्रकर्षाने भासत होती तशी यावेळी ती थोडी जास्तच भासली. आयुष्यातील सर्वच प्रसंगांना मनावर दगड ठेवून सामोरे जावे लागत होते.

नांदेडच्या स्टेशनवर मला निरोप देण्यासाठी सारंगचे आई बाबा मनोहर धर्मापुरीकर आणि सौ. रमा धर्मापुरीकर दोघेही फुलांचा बुके घेवून आले होते. आत्तापर्यंत माझ्यासाठी असा फुलांचा बुके वगैरे कुणी आणला नव्हता त्यामुळे थोडे संकोचल्यासारखे झाले, गहीवरूनही अले. पण मनातून खूप छान आणि प्रसन्न वाटले.

मुंबईला आल्यानंतर पुन्हा खरेदी. निलूने पण रश्मीसाठी आणि तिच्या बाळासाठी काही सामान घेवून दिले. अमेया तर लहान मुलांसाठी काही पण वस्तू दिसली की ती घेवून बास्केटमध्ये टाकत होती. भरपूर खरेदी आणि रोज जाण्याबद्दल होणारी चर्चा. अटलांटाला विमान बदलायचे होते, ते वेगळेच टेन्शन. गिरीष सारखे म्हणायचे की अटलांटापासून रश्मीचे ठिकाण जास्त दूर

नाही. ते यू. एस. मधेच असल्यामुळे तुम्ही पटकन संपर्क साधू शकता. तिथून तुम्हाला कुणीही फोन लावून देईल. मला पण थोडे बरे वाटायचे. गिरीषने पैसे एक्स्चेंज करून आणले. डॉलर मी पहिल्यांदाच बघत होते. जवळ काही डॉलर आणि भारतीय चलन पण ठेवले. अमेयाची सारखी बडबड चालू होती. तिलाही माझ्या बरोबर यावेसे वाटत होते. ती मला सारखी म्हणायची,

'आजी, मी पण तुझ्या बरोबर रश्मी मावशी कडे अमेरिकेला येते. '

'तुझा पासपोर्ट नाही राजा. आपण आधी तो काढून घेवू, मग तुला येता येईल. ' मी तिची समजूत काढायचे. मग ती एवढेसे तोंड करून बसायची. एकदा ती मला म्हणाली,

'आजी, माझ्याकडे माझ्या शाळेचे आयडिंटी कार्ड आहे ना. त्यावर माझा फोटो पण आहे. तू विचार ना त्यांना की ते कार्ड दाखवले तर जावू देतात का ते? ' पण तिला बरोबर घेवून जाणे किती अशक्य आहे हे तिला सांगताना जड जात होते. रश्मी मावशीच्या बाळाचे नाव 'रोझी' ठेवायचे हे तिने मला तीन तीनदा बजावून सांगितले होते. त्या दिवशी माझी पुतणी डॉ. सौ. अनघा देशपांडे पण घरी आली होती. तिचे दीर तिथेच असतात, त्यांना देण्यासाठी तिने काही पार्सल आणले होते.

निघेनिघे पर्यंत सामानाची बांधाबांध सुरूच होती. सुटकेसच्या वजनाचा अंदाज येत नव्हता. गिरीषने दोन्ही तिन्ही बॅग दुकानात नेवून वजन

करून आणल्या. ते व्यवस्थित होते. शेवटी जाण्याचा दिवस येवून ठेपला. निघतांना एकदा नमा, निखिल आणि घरी भावनाला फोन केला. त्या दिवशी मला शुक्रवार होता. दुपारी उशिरा जेवणे झाल्यामुळे रात्री काही खाण्याचा प्रश्नच नव्हता आणि इच्छा पण होत नव्हती. एयर पोर्टवर जाण्यासाठी गिरीषने गाडी सांगितली होती. सव्वीस तारखेच्या अतिरेक्यांच्या हल्ल्यामुळे विमानतळावर खूपच कडक बंदोबस्त होता. कुणालाही आत येवू देत नव्हते. गिरीष, निलू, अमेया सोडवायला आले होते पण त्यांना थांबता आले नाही. मला आत सोडून ते लगेच निघून गेले. तिथे आत प्रवेश करायचा म्हणजे मला एखाद्या जादूई नगरीत प्रवेश करत असल्यासारखेच वाटले. ते अवाढव्य विमानतळ मी पहिल्यांदाच बघत होते. घाबरलेले असले तरी दाखवता येत नव्हते. रश्मीने पण मला सांगून ठेवलेच होते की तुला जर काही अडचण आली तर तू कुणालाही विचार. संकोच करू नकोस. तिने तर मला एक लांबलचक सूचनांची यादी पाठवली होती. एयरपोर्ट वर आत प्रवेश केल्यापासून तो सॅनफ्रानसिस्कोला ते दोघे दिसेपर्यंत काय काय करायचे ते सगळे लिहून पाठवले होते. ती यादी पण मी जवळच ठेवली होती.

विचारत विचारतच मी डेल्टाच्या चेक इन पर्यंत पोंचले. रांगेत उभे असतांना तिथले एजंट प्रश्न विचारत होते. सामान कुणी भरले? सामानात काय काय आहे? सामान मधेच सोडून तुम्ही कुठे गेला होता का? वगैरे, वगैरे. त्यांनी काही फॉर्मही भरून घेतले. सारखी धाकधूक वाटत होती. शेवटी एकदाचे चेक

इन झाले. एकदाचा बोर्डिंग पास मिळाला. फक्त साडेनऊ वाजले होते. अजून भरपूर वेळ होता. गिरीष, निलूला फोन करून सांगितले की तुम्ही काही काळजी करू नका. आता घरी जा. सगळे व्यवस्थित झाले आहे. माझा फोन जाईपर्यंत ते असेच जवळपास कुठेतरी थांबणार होते.

दहा वाजायला आले तशी पोटात थोडी थोडी भुकेची जाणीव होवू लागली होती. एवढा वेळ टेन्शन असल्यामुळे काही सुचले नव्हते. आता एकदम फ्री झाले होते. कॉफी घ्यावीशी वाटली म्हणून एका कॉफी शॉप मध्ये गेले. पैसे देण्यासाठी त्याला विचारले,

‘कितना पैसा देनेका? ’

तो म्हणाला ‘सिक्स्टी’.

मी दहा रुपयांची नोट आधीच पर्स मधून काढून ठेवली होती. नंतर वीस रुपयांची नोट काढून त्याला देवू लागले. मला वाटले तो सिक्स्टीन म्हणाला.

‘मॅडम, सिक्स्टीन नाही, सिक्स्टी. सिक्स झिरो. ’ तो म्हणाला.

मी हबकूनच गेले. बाप रे! एका कपाला साठ रुपये? तेवढ्यात तर एका माणसाचे छान जेवण होईल. मला राहवलेच नाही. मी त्याला म्हणाले,

‘इतना महंगा कैसे? ’

‘ये इंटर नैशनल एयर पोर्ट है मॅडम. ’ त्याने एकाच वाक्यात उत्तर दिले. त्याने माझी कीव केल्यासारखेच मला वाटले.

ती साठ रुपयांची कॉफी मी प्याले खरी पण मन खूपच अस्वस्थ झाले होते. आता ही पोटातली मळमळ कुणाला तरी सांगावीशी वाटत होती. मग लगेच बहिणीला, उषाला, औरंगाबादला फोन केला. (अशा गोष्टी बहिणीशिवाय दुसरे कोण समजून घेणार? ) तिला आणि सुनीलरावला जेव्हा मी सांगितले की मी साठ रुपयांची कॉफी विकत घेवून प्याले, आणि त्यांनीही हसून त्याला प्रतिसाद दिला, त्यावर कॉमेंटस केल्या तेव्हा कुठे मला थोडे बरे वाटले.

वेटिंग हॉलमध्ये बसल्यावर जवळपासच्या बायकांशी बोलणे सुरु केले. त्यातली एकजण चांगली होती. ती पण एकटीच होती आणि एकदोनदा अमेरिकेला जावून आलेली होती. तिने बरेच काही सांगितले. पंधरा मिनिटे आधी प्रवेश करत असलेली पायलट आणि एयर होस्टेसची टीम दाखवली. आपल्या जवळ असलेल्या बोर्डिंग पासवर असलेला झोन नंबर पुकारला की आपण जायचे असे सांगितले. आधी म्हातारी माणसे, लहान मुले यांना सोडत होते. हळू हळू बारा वाजायला येत होते. नमा, निलू आणि भावनाला पुन्हा एकदा फोन केला. कारण थोड्याच वेळात तो बंद होणार होता. बरोबर सहा डिसेंबरला सकाळी बारा वाजून दहा मिनिटांनी डेल्टा एयर लाईन्सच्या डीएल १८५ या विमानाने मुंबईहून अटलांटाला जाण्यासाठी हवेत उड्डाण केले.

आत्तापर्यंत जमिनीवरचे प्रॉब्लेम होते आता हवेतील प्रॉब्लेम सुरु झाले. कुणीतरी सांगितले होते की कानात कानठाळी बसते, कान दुखतो. त्यामुळे मी आधीच कानात घालण्यासाठी खूप सारा कापूस जवळ घेवून ठेवला होता.

त्या कापसाची पण गंमत झाली. मी चांगला घरचा कापूस निवडून आणला होता. निलूने तो बघितला आणि ती माझ्यावर ओरडलीच. ती म्हणाली,

'आई, तू विमानातून अमेरिकेला जाते आहेस. असा घरचा गाठी असलेला कापूस बरोबर नेवू नकोस. '

मी म्हणाले, 'अगं मी तो निवडून आणलाय स्वच्छ. '

तर ती हसूच लागली. मला म्हणाली, 'निवडून कशाला आणलास? तुला विमानात खूप वेळ मिळाला असता की तो निवडायला. आणि त्यातली सरकी टाकण्यासाठी तिथे डस्टबीन पण मिळाली असती. '

तिने माझ्या पर्समधला तो सगळा कापूस काढून टाकला आणि तिच्याकडे असलेला पाकिटातला स्वच्छ घडीचा कापूस माझ्या पर्समध्ये ठेवला. आताही तो कापूस कानात घालतांना हे सगळे आठवून मला हसायला येत होते. त्यानंतर बेल्ट कसा लावायचा ते माहित नव्हते. जवळच्या एका मुलीला विचारले. तिने मला बेल्ट लावून दिला. गिरीष आणि निलूने सांगितले होते की विमान वर जातांना पोटात थोडी कळ येते, तरी तुम्ही घाबरू नका. त्याची पण मी मनाची चांगलीच तयारी करून ठेवली होती. खूप जोरात कळ येईल अशी अपेक्षा मी केली होती, पण ती केव्हा येवून गेली तेच मला कळले नाही. हवाईसुंदरी (त्या पण आपल्या सारख्याच असतात. ) इकडून तिकडे फिरून अगत्याने काय हवे, काय नको ते विचारीत होत्या. त्यांनी सर्वांना टी. व्ही.

बघण्यासाठी हेड फोन्स दिले. तसेच कानात घालण्यासाठी रबरी बूच, कुणाला प्रकाश नको वाटत असेल तर डोळयांवर ठेवण्यासाठी दोन कापडी गोल, असे बरेच काय काय दिले. त्या वस्तू घेवून कोण काय काय करते ते मी बघत होते. अंधार असल्यामुळे बाहेर बघण्याचा प्रश्नच नव्हता. प्रत्येकाच्या सीटसमोर टी. व्ही. होता. आणि प्रत्येकजण आपल्या समोरचा टी. व्ही. बघण्यात मग्न होते. मी शेजारच्या मुलाला विचारले. त्याने तो कसा सुरु करायचा ते सांगितले. त्याने माझा टी. व्ही. सुरु करून दिला. एकदा सांगितल्यावर मला जमले. (विमानातील सगळे प्रवासी भारतीय होते म्हणून आपलेच वाटत होते. ) एकदा टी. व्ही. सुरु झाल्यानंतर त्यात काय काय आहे ते बघितले. वेळ कसा गेला ते समजले नाही. पण आता भूक लागल्यासारखी वाटत होती. तेवढ्यात विमानातील जेवण आले. रात्रीचे बारा वाजून गेल्यामुळे शुक्रवार संपला होता. त्यामुळे आता जेवण करायला हरकत नव्हती. जेवण झाल्यानंतर पुन्हा टी. व्ही., मधून मधून कॉफी, खायला काहीतरी असे रात्रीचे व्यवहार सुरु होते. मी पण ‘भूतनाथ’ हा सिनेमा बघितला. थोडी झोप घेतली. माझे ‘हवेत उडणे’ चालू होते.

# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही व्यावसायिक प्रकाशन संस्था नाही. काही सामाजिक ध्येय डोळ्यांसमोर ठेवून मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती यांच्यासाठी ही तरुणांची संस्था काम करते आहे. सध्या ई साहित्य प्रतिष्ठानचे सव्वा दोन लाख वाचक आहेत.

ई साहित्य प्रतिष्ठानच्या पुस्तक खजिन्यात सातत्याने नवनवीन भर पडत असते. २०१४ मध्ये सुमारे शंभर ई पुस्तके आम्ही प्रकाशित केली. नवीन खूप सारी पुस्तकं लवकरच येत आहेत. एकाहून एक भारी. ही सर्व पुस्तकं सर्वच्यासर्व सव्वा दोन लाख वाचकांना देण्याचा आटोकाट प्रयत्न केला जातो. पण प्रत्येक वेळी ते जमतेच असे नाही. अनेक वाचकांपर्यंत काही पुस्तके पोहोचत नाहीत. पण VIP सदस्यांना मात्र सर्व पुस्तके नक्की दिली जातात. तुम्हाला सर्वच्या सर्व पुस्तके हवी असतील तर VIP सभासद बना.

VIP सभासद बनणं अगदी सोप्पं आहे. आपल्या ओळखीच्या दहा लोकांचे मेल आय डी कळवा आणि बना VIP सभासद.

एका दमात तीन कामं.

1. पहिलं म्हणजे तुम्ही VIP सभासद बनता. तुम्हाला ई साहित्य प्रतिष्ठानचं पुस्तक ई मेलवर सर्वात आधी मिळतं. त्यांच्या भावी योजनांची माहिती मिळते. त्यांच्या कामात स्वतः सहभागी होण्याची संधी मिळते.

2. ज्या दहा किंवा अधिक मित्रांना तुमच्यामुळे फ़्री पुस्तकं मिळतात ते खुश होतात. त्यांना त्यांच्या आवडीची पुस्तकं मिळाली की ते इतर लोकांना तुमच्याबद्दल सांगतात. त्यांच्यासाठी तुम्ही म्हणजेच ई साहित्यचे प्रतिनिधी बनता.

3. आणि यातून तुम्ही मराठी भाषेच्या संवर्धनाला अमूल्य असा हातभार लावता. आमचा उद्देश आहे मराठीतल्या सहा कोटी साक्षरांना वाचक बनवणं. आणि हे लक्ष्य साध्य करणं हे केवळ आणि केवळ मराठी लोकांना त्यांच्या भाषेवर असलेल्या प्रेमातूनच शक्य आहे. आपल्या भाषेचं राज्य व्हावं म्हणून १०६ हुतात्मे झाले. आपल्या भाषेनं राजा व्हावं म्हणून आपण एक दहा-वीस ई मेल आयडी देणारच ना! वाचनाची आवड असो वा नसो. फ़क्त मराठी साक्षर अशा दहा लोकांचे ई मेल पत्ते पाठवा. त्यांना वाचनाची आवड आपोआप लागेल. आपणच लावू. लावूच लावू. करूनच दाखवू.

आहे ना : एक दम : तीन काम.

संपर्क साधा : esahity@gmail.com

ही सेवा पूर्णपणे निःशुल्क आहे. त्यामुळे आपले मित्र आपल्यावर खुश होतील. शिवाय आम्ही ही खात्री देतो की या ई मेल्सचा वापर फ़क्त आणि फ़क्त मराठी साहित्य पाठवण्यासाठीच केला जाईल. इतर कसल्याही जाहिराती पाठवून त्यांना त्रास दिला जाणार नाही. तेव्हा लवकरात लवकर आपल्या माहितीतल्या दहा किंवा अधिक मराठी साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला द्या.

www.esahity.com या वेबसाईटला भेट द्या.

आपल्या पत्राची वाट पहात आहोत.

धन्यवाद

आपले नम्र

टीम ई साहित्य प्रतिष्ठान